पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४७ ■ शुक्रवार, दि. २६ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# विशिष्ट घनकचरा ठेकेदाराच्या नियुक्तीसाठी खटाटोप...

## विरोधी पक्ष नेता डॉ. जीशान हुसेन यांची मागणी, मांडले विविध मुद्दे

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** अकोला महानगरपालिकेने घराघरातून घनकचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेवर काँग्रेसचे नगरसेवक व विरोधी पक्षनेते डॉ. जीशान हुसेन यांनी गंभीर आक्षेप घेत निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. विशिष्ट ठेकेदाराच्या नियुक्तीसाठी महापालिका प्रयत्नशील असल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षनेता व काँग्रेस गटनेता डॉ. जीशान हुसेन यांनी केला आहे.

महापालिका आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, ८ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेमध्ये अनेक कायदेशीर त्रुटी, स्पर्धा मर्यादित करणाऱ्या अटी, प्रकल्प खर्चाची माहिती लपविणे तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ चे पालन न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. जीशान हुसेन यांनी दावा केला आहे की निविदेतील काही पात्रता अटी विशिष्ट कंपनीला लाभ मिळावा यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. निविदेत २०२४ नंतर



नोंदणीकृत २५० हायड्रॉलिक वाहने, १२५ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल आणि एका महानगरपालिकेत १ लाख घरांचे कामकाजाचा अनुभव अशा अटी घालण्यात आल्या असून त्यामुळे इतर पात्र कंपन्यांना स्पर्धेतून बाहेर ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.तसेच, निविदेमध्ये प्रकल्पाची अंदाजित किंमत जाहीर करण्यात आलेली नसल्याने पारदर्शकतेचा अभाव असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सुमारे २६० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या प्रकल्पाची माहिती नागरिकांपासून लपविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनात घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ लागू झाल्यानंतरही निविदेमध्ये जुन्या २०१६ च्या नियमांचा संदर्भ देण्यात आल्यामुळे कायदेशीर संभ्रम निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच कंत्राटदारांना देयके उशिरा दिल्यास महापालिकेवर कोणताही दंड नसताना कामगारांचे वेतन वेळेवर न दिल्यास कंत्राटदारावर कारवाईची तरतूद असल्याने आर्थिक भार अखेरीस नागरिकांवर पडणार असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

डॉ. जीशान हुसेन यांनी या संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करून संबंधित कागदपत्रे, फाईल नोटिंग, बैठकींचे इतिवृत्त आणि निविदा मसुदा तयार करण्यामागील प्रक्रिया सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. तसेच ३० जून रोजी होणारी निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करून सर्व आक्षेपांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांमुळे अकोला महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज च्या बातमीचा दणका, भूमी अभिलेख विभागात...

# त्या संशयित ज्युनिअर अधिकाऱ्यांच्या मुदतपूर्व बदल्या !

### कारवाई की 'सेफ पॅसेज'?, भ्रष्टाचाराची चौकशी दडपण्याचा खटाटोप?

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** अकोल्याच्या भूमी अभिलेख विभागातील गंभीर अनागोंदी कारभारावर आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने प्रकाश टाकताच प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या बातमीचा मोठा इम्पॅक्ट पाहायला मिळाला असून, विभागाने तडकाफडकी ४ ज्युनिअर अधिकाऱ्यांच्या मुदतपूर्व बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. मात्र, उपअधीक्षक पंकज पवार यांच्या निलंबनानंतर या कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई होणे अपेक्षित असताना, केवळ त्यांच्या बदल्या करून मूळ प्रकरणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न तर होत नाही ना ? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे. विधी मंडळ सुरु असताना विभागाने घाईघाईने जारी केलेल्या आदेशानुसार खालील कर्मचाऱ्यांना तातडीने अकोल्याबाहेर हलवण्यात आले आहे. भूमापक कुणाल राजपूत यांची वरुड येथे, परिरक्षण भूमापक राजेश शेगोकार यांची लोणार येथे, तर परिरक्षण भूमापक सचिन कोलते यांची धारणी येथे बदली झाली. भूमापक गजेंद्र चव्हाण यांची मुदतपूर्व बदली संग्रामपूर येथे करण्यात आली. भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर गंभीर आर्थिक अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली निलंबनाची कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, या संपूर्ण गैरव्यवहारात आणि संशयास्पद फाईल्स मंजूर करण्यात बदली झालेल्या काही कनिष्ठ अधिकाऱ्यांनी (ज्युनिअर ऑफिसर्स) त्यांना पडद्यामागून मोठी मदत केल्याचे संकेत मिळत होते. कायद्यानुसार, मुख्य आरोपी निलंबित झाल्यावर या संपूर्ण 'सिंडिकेट'वर विभागीय चौकशी बसवून पोलिसांच्या हवाली करणे गरजेचे होते. परंतु, कडक कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने या चारही अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या तालुक्यांत आणि जिल्ह्यांत विखुरले आहे.

RRC News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

#### प्रशासकीय अनागोंदी दाबण्याचा प्रयत्न ?

गुन्हा दाखल झालेल्या उपअधीक्षकांच्या निकटवर्तीयांना थेट 'सेफ पॅसेज' देण्यासाठीच तर या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत ना ? आरोपींना अकोल्यापासून दूर केल्यामुळे मुख्य चौकशी विस्कळीत होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. 'सिटी न्यूज सुपरफास्ट' च्या दणक्यामुळे प्रशासनाला या बदल्या करणे तर भाग पडले, परंतु ही केवळ वरवरची मलमपट्टी असून या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आता अकोलेकरांमधून जोर धरू लागली आहे.

#### पवार यांच्यावर झालेले आरोप

उप अधीक्षक पंकज पवार यांच्या विरोधात दाखल एफ आय आर मध्ये शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ताप्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्ट्याच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनविले होते. खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवण्याचा उद्योग केला. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. असा आरोप गुन्हा दाखल करताना विभागाने पंकज पवार यांच्यावर केला होता. तर या सर्व प्रकरणात ज्युनिअर ऑफिसरची भूमिका काय होती. त्याच्या केवळ बदल्या करण्याने हे प्रकरण मिटविण्याचे प्रयत्न सुरु आहे.

# कृषी विद्यापीठाच्या अमरावती येथील संशोधन जमिनीवर डल्ला ?

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची अमरावती येथील अत्यंत मौल्यवान आणि संशोधनाच्या कामासाठी राखीव असलेली तब्बल ७ हेक्टर जमीन कृषी विभागाला विनामूल्य हस्तांतरित करण्यासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विद्यापीठाच्या कुलसचिव या ही जमीन देण्यासाठी अत्यंत घाईघाईने प्रयत्नशील असून, कार्यकारी परिषदेची दिशाभूल करून हा ठराव मंजुरीसाठी ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप आता होऊ लागला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती येथील तपोवन रोडवर असलेल्या कृषी संकुलातील गट क्र. ४ मधील ७ हेक्टर जमीन कृषी विभागाच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

मात्र, इतकी मोठी आणि संशोधनासाठी महत्त्वाची असलेली जमीन हस्तांतरित करताना विद्यापीठ स्तरावर कोणतीही सखोल शहानिशा करण्यात आलेली नाही.

विद्यापीठाच्या हिताचा विचार न करता, कुलसचिवांनी थेट कार्यकारी परिषदेसमोर हा ठराव मंजुरीसाठी आणल्याने आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रियेला कायदेशीर कव्हर देण्यासाठी अमरावती येथील प्रादेशिक संशोधन केंद्राचे प्रमुख तथा शास्त्रज्ञ यांच्याकडून तातडीने एक पत्र मागवून घेण्यात आल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेतील इतर सदस्य आता काय भूमिका घेतात आणि या कथित जमीन वाटपाची उच्चस्तरीय चौकशी होणार का, याकडे संपूर्ण कृषी वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

#### घाईघाईने दिलेला अभिप्राय

विशेष म्हणजे, विभागीय कृषी सहसंचालकांचे पत्र १८ जूनला येते आणि त्याच दिवशी (१८ जून रोजीच) अमरावती संशोधन केंद्राकडून 'सदर जमीन हस्तांतरित करण्यास काही हरकत नसावी' असा घाईघाईचा अभिप्राय देऊन टाकला जातो. एकाच दिवसात झालेल्या या चक्राकार पत्रव्यवहारामुळे आणि वरिष्ठ पातळीवरून दबाव आणून हे 'नियमबाह्य' पत्र तयार करून घेतल्याच्या आरोपाला बळकटी मिळत आहे.

#### संशोधनाची जमीन विनामूल्य देण्याचा अट्टाहास का?

सदर जमीन ही मूळची डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या मालकीची (कुलसचिवांच्या नावे) असून ती विद्यार्थ्यांच्या आणि शास्त्रज्ञांच्या संशोधनासाठी अत्यंत आवश्यक आहे. असे असतानाही, विद्यापीठाचे नुकसान करून ही कोट्यवधी रुपयांची जमीन कृषी विभागाला विनामूल्य का दिली जात आहे? यासाठी कोणाचा राजकीय किंवा प्रशासकीय दबाव आहे का? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

# आता सखोल चौकशी, जबाबदारी निश्चितीची वेळ आली आहे- खा. संजय राऊत

प्रतिनिधी २६ जून

**मुंबई :** 'अयोध्या येथील राम मंदिराच्या उभारणीसाठी शिवसेनेने दान केलेली ४ किलो वजनाची चांदीची वीट बेपत्ता झाल्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. उद्धव ठाकरे यांनी हजारो शिवसैनिक आणि साधू-संतांच्या उपस्थितीत १ कोटी रुपये आणि ही पवित्र चांदीची वीट सढळ हाताने दान केली होती. तरीही, इतकी वर्षे उलटूनही ट्रस्टकडून त्याबाबत कोणतीही पावती किंवा माहिती मिळालेली नाही. ती वीट नक्की कुठे गेली? आता सखोल चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे!' असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी मंदिराच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अयोध्या राम मंदिरातील दानातील चोरी प्रकरणात कायदेशीर कारवाई सुरू झाली आहे. एसआयटीचा प्राथमिक तपास अहवाल मिळाल्यानंतर, रामजन्मभूमी पोलीस ठाण्यात आठ आरोपींविरुद्ध नावे नमूद करून एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अयोध्यातील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने एफआयआर दाखल केल्यानंतर, आठ जणांना आरोपी बनवण्यात आलंय. ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांनी एसआयटीच्या प्राथमिक अहवालाच्या आधारे ही तक्रार केली.




जीवेत शरदः शतम्

शेंबाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ शेंबाळपिंपरीचे कार्याध्यक्ष तथा संस्थेचे युवा नेतृत्व

श्री. संग्रामभाऊ सुजयराव देशमुख

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

श्री. संग्रामभाऊ देशमुख

-• शुभेच्छूक •-

रविंद्र वसंतराव महल्ले

प्राचार्य

- दत्तराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, शेंबाळपिंपरी ता. पुसद
- यशवंत विद्यालय, शेंबाळपिंपरी ता. पुसद
- जवाहरलाल नेहरु मा. वि. वसतिगृह, शेंबाळपिंपरी ता. पुसद

समस्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद

J.K. FURNISHING

Sleepwell Gallery

Your Own Mattress Store


- Foam Mattress
- Pillow, Cushions
- Coir Mattress
- Sofa Fabric



Bhaskar Jawarkar 9146099196 / 9422190280

Aditya Jawarkar 9689509334

Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898





CMYK

## किवी फळ शेतीने शेतकऱ्यांचे नशीब चमकवले!

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील शेतकरी आता बागायती पिकांच्या लागवडीत अधिक रस घेत आहेत. टोमॅटो, सिमला मिरची, सोयाबीन, वाटाणे, आले, लसूण या नगदी पिकांच्या लागवडीतून येथील शेतकरी चांगले उत्पन्न घेत आहेत. विशेषत: सिरमौर जिल्ह्यातील पच्छड भागात शेतकरी मोठ्या प्रमाणावर किवीची लागवड करत आहेत. येथील शेतकरी किवीपासून वर्षाला लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. त्यामुळेच पच्छाद परिसरात किवीचे क्षेत्र १६ हेक्टरपर्यंत वाढले आहे. नरग उप-तहसीलच्या थलेडी गावातील प्रगतशील शेतकरी विजेंद्र सिंह ठाकूर मोठ्या प्रमाणावर किवीची लागवड करत आहेत. ठाकूर यांनी १९९० च्या दशकात एलिसन आणि हेवर्ड जातींची १०० रोपे लावून किवी शेती सुरू केली. चार वर्षांनंतर त्यांनी आपल्या बागेत आणखी ५० रोपे लावली. ते म्हणाले की, चालू वर्षी मी माझ्या बागेतून सुमारे ५० क्विंटल किवीचे उत्पादन घेतले, ज्यातून मला सुमारे १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

# वसतिगृहाच्या चळवळीतून सामाजिक सुधारणा करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज

भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात अनेक महापुरुषांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 'शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र' मानले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. जागतिक स्तरावरही अमेरिकेचे शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्यूई, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रध्यक्ष नेल्सन मंडेला आणि इतर अनेक विचारवंतांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचा पाया मानले. मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करण्यासाठी केवळ शाळा उभारणे पुरेसे नसते; विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची आणि सुरक्षित वातावरणाचीही गरज असते. ही गरज ओळखून वसतिगृहांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभारणारे भारतातील अग्रगण्य समाजसुधारक म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज. २६ जून १८७४ रोजी जन्मलेल्या यशवंतराव घाटगे यांना पुढे कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक घेण्यात आले. पुढे ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून इतिहासात अजरामर झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी करवीर संस्थानची राज्यसूत्रे स्वीकारली. ६ मे १९२२ ला त्यांचे निधन झाले. अवघ्या ४८ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रात इतके क्रांतिकारी कार्य केले की, त्यांना आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे शिल्पकार म्हणून गौरविले जाते. बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहूंनी अनेक चळवळी उभी केल्या त्यातील सर्वाधिक प्रभावी चळवळ ही वसतिगृहांची चळवळ ठरली आहे. राज्याच्या कोषातून, राजाच्या उपयोगाच्या, मंदिराच्या डागडुजीच्या पैशाला त्यांनी वसतीगृहासाठी वळते केले. काहींना वार्षिक मदत, काहींना इमारती, काहींना जमीनी देऊन स्वत: उभे राहून त्यांनी वसतिगृहे उभारली.



शाहू महाराजांच्या विचारांवर महात्मा ज्योतिराव फुले, यांच्या सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. बहुजन समाजाचे उत्थान शिक्षणातूनच होऊ शकते, हा फुले यांचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासनात उतरविला. एका शतकानंतरही आजही त्यांच्या वसतिगृहांमधून अनेकांचे आयुष्य घडत असून त्यांनी सुरू केलेली ही चळवळ जवळपास १२५ वर्षानंतरही अजूनही सक्षमपणे विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे.कोल्हापुरात विविध ठिकाणी उभे असणारे हे वसतीगृह छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची कल्पना देणारे ठरतात.

सुरुवातीला सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहाचा प्रयोग करण्यात आला. राजाराम वसतिगृह हा त्याचा प्रारंभिक प्रयत्न मानला जातो. मात्र प्रत्यक्षात सामाजिक विषमता आणि जातीय पूर्वग्रहांमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपेक्षित वातावरण मिळत नव्हते. काही ठिकाणी प्रवेशाचे धोरण सर्वांसाठी खुले असले तरी प्रत्यक्ष लाभ काही मोजक्या घटकांनाच मिळत असल्याचे शाहू महाराजांच्या निदर्शनास आले. या अनुभवातून त्यांनी स्वतंत्र समाजनिहाय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. जातीव्यवस्थेचा पगडा समाजावरून जात नसल्यामुळे शाहू महाराजांनी काढलेला हा उपाय बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरला. या वसतिगृहांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित समाजातील सुशिक्षित आणि विश्वासार्ह व्यक्तींवर सोपविण्यात आली. त्यामुळे समाजातील नेतृत्व विकसित झाले आणि शिक्षणाची चळवळ लोकचळवळ बनली. सामाजिक परंपरा, चातुर्वर्ण्याचा प्रभाव त्यामुळे पुढे त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांना वेगळी वसतीगृहे काढून जातीच्या उतरंडीच्या जोखडातून मुक्त केले.

कोल्हापूर संस्थांमध्ये १८९६-९७ ला दुष्काळ पडला. ग्रामीण भागातून मुले शिक्षणासाठी येणे बंद झाले. राहणे, खानावळ, कपडालत्ता सर्वच गरीबांना परवडणे शक्य नव्हते. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली याशिवाय लंडन दौऱ्यामध्ये तेथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास केल्यावर त्यांना वसतिगृह ही कल्पना नावीन्यपूर्ण व परिवर्तनाची वाटली. १९०१ पासून कोल्हापूरमध्ये वसतिगृह उभारणीची व्यापक चळवळ सुरू झाली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, दैवज्ञ बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग, कोष्टी, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, ढोर- चांभार समाजासाठी इंदुमती राणीसाहेब वसतीगृह, अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी अर्थात अस्पृशांसाठी 'मिस क्लार्क' वसतिगृह उभारण्यात आली. संशोधनपर नोंदींनुसार शाहू महाराजांनी सुमारे २० ते २२ वसतिगृहांचे जाळे उभे केले होते.

शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९०८ मध्ये सुरू झालेले 'मिस क्लार्क वसतिगृह'. हे वसतिगृह अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले होते. हजारो वर्षे ज्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्या गेले. त्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे सताड उघडणारा हा क्रांतिकारी निर्णय होता. तत्कालिन व्यवस्थेत या निर्णयाची चर्चा देशभर झाली. शाहू महाराजांची ही दूरदृष्टी आणि या निर्णयाची गरज काय होती हे त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात शिक्षणासाठी १९२० मध्ये त्यांनी केलेल्या मदतीतून स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराजांची मागासवर्गीयांबाबतची कणव यातून स्पष्ट होते.

१९०८ मध्ये स्थापन झालेले मिस क्लार्क वसतिगृह हे भारतातील दलित विद्यार्थ्यांसाठीच्या सर्वात महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांपैकी एक होते. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी देणगी व जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून शाहू महाराजांनी त्यांच्या नावाने वसतिगृह सुरू केले. हे वसतिगृह दलित शिक्षणाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले. शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत, खेळाचे मैदान आणि आर्थिक अनुदान उपलब्ध करून दिले.

वसतिगृह ही केवळ निवासाची व्यवस्था नव्हती. तेथे निवास, भोजन, अभ्यासासाठी जागा, शिष्यवृत्ती, ग्रंथालय, शिस्तबद्ध वातावरण आणि सामाजिक जाणीव यांची सांगड घालण्यात आली होती. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शहरातील शिक्षणाशी जुळवून घेण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरले. आजही हे वसतीगृह सुरू असून या ठिकाणी माजी विद्यार्थ्यांकडून सुंदर इमारत उभारली आहे.

मुस्लिम विद्यार्थ्यांसाठीही त्यांनी याच काळात वसतीगृह उभारले. हे वसतिगृह आजही सुरू असून सर्व समाजातील विद्यार्थी या ठिकाणी प्रवेश घेतात. शाहू महाराजांनी ठरवून दिल्याप्रमाणे मुस्लिम ट्रस्टद्वारे हे वसतिगृह आजही कार्यरत असून विविध मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. महाराष्ट्रात अशा पद्धतीच्या वसतिगृहांची रचना कुठेच दिसून येत नाही. विशेष म्हणजे शंभर वर्षानंतरही हे वसतिगृह अजूनही विद्यार्थ्यांना अल्पदरामध्ये राहण्याची, जेवणाची, निवाऱ्याची, व्यवस्था करून देते.अनेक पिढ्यांना घडविण्याचे काम या दगडी कोरीव इमारतीतून झाले असून कोल्हापूरचा फेरफटका मारल्यानंतर या वास्तू आजही लक्ष वेधून घेतात.

शाहू महाराजांनी शिक्षण आणि रोजगार यांचा परस्परसंबंध ओळखला होता. शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय युवकांना नोकरीची संधी मिळाली नाही तर त्यांचा शिक्षणावरील विश्वास कमी होईल, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. भारतातील आरक्षणाच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड मानला जातो. शिक्षण, वसतिगृहे आणि आरक्षण या त्रिसूत्रीमुळे बहुजन समाजात नवे नेतृत्व निर्माण झाले.

शाहू महाराजांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. १९१७ मध्ये त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. सात ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना शाळेत पाठविणे पालकांसाठी बंधनकारक करण्यात आले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांवर दंड आकारण्याची तरतूदही करण्यात आली होती. काही नोंदींनुसार विलंब करणाऱ्या पालकांकडून दरमहा एक रुपया दंड आकारला जात असे.स्वतःच्या दरबार खजिन्यातून आणि देवस्थान फंडातून पैसे वळते करून शिक्षणाला महत्त्व देणारा हा राजा म्हणूनच सामाजिक क्रांतीचा जनक मानला जातो. या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून शाहू महाराजांनी विशेष शिक्षण कर लागू केला. डॉक्टर, वकील, सावकार, अधिकारी आणि विशिष्ट उत्पन्न गटातील घटकांकडून शिक्षण उपकर आकारण्यात येत असे. शिक्षणासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याचा हा दूरदृष्टीचा निर्णय होता. शाहू महाराजांच्या कार्यकाळात कोल्हापूरला 'शिक्षणाची काशी' म्हणून ओळख मिळाली. १९१७ मध्ये संस्थानात केवळ २७ शाळा आणि सुमारे १,३०० विद्यार्थी होते. मात्र १९२२ मध्ये त्यांच्या निधनाच्या वेळी शाळांची संख्या ४२० पर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या २२ हजारांहून अधिक झाली होती. शिक्षणाचा हा विस्तार अभूतपूर्व मानला जातो.

शाहू महाराजांनी कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' असे संबोधले होते. महाराष्ट्रभर उभारल्या गेलेल्या वसतिगृहांच्या चळवळीमागे त्यांचीच प्रेरणा होती. त्यांनी उभारलेल्या या वसतीगृहाचा लाभ, या वसतिगृहांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या विविध क्षेत्रात नाव कमावणाऱ्या अनेकांनी घेतला आहे. आज महाराष्ट्र शासन समाजकल्याण, इतर मागास बहुजन कल्याण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, भटक्या-विमुक्त कल्याण तसेच मराठा समाजासाठी उभारण्यात येणाऱ्या विविध वसतिगृहांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत आहे. या सर्व योजनांच्या पायाशी शाहू महाराजांनी मांडलेली 'शिक्षण सर्वांसाठी' हीच मूलभूत संकल्पना असल्याचे स्पष्ट दिसते. वसतिगृह केवळ विद्यार्थी घडवत नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते राज्य शासनाने वसतिगृहाचे महत्त्व लक्षात घेऊन विविध खात्यामार्फत हजारो वसतिगृहांची, आश्रमशाळांची उभारणी केली आहे. या सुविधांमधून तयार झालेली एक पिढी राज्याचे विविध क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.

राजर्षी शाहू महाराजांचे संपूर्ण कार्य पाहिले तर त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन मानले नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाचे माध्यम मानले. ब्रिटिश भारतामध्ये अन्य राज्यांमध्ये शिक्षणावर जितका खर्च होत नव्हता तितका खर्च कोल्हापूर सारख्या एका छोट्या संस्थांमध्ये महाराजांच्या दूरदृष्टीमुळे व शैक्षणिक महत्त्व त्यांना पटल्यामुळे होत होता. शैक्षणिक आघाड्यांवर महाराष्ट्रामध्ये पुढे मोठ मोठ्या संस्था उभ्या झाल्या, विद्यापीठे उघडल्या गेली, या सर्वांची प्रेरणा छत्रपती शाहू महाराज होते.

शाहू महाराजांनी उभी केलेली ही वसतिगृहे आजही ताठ मानेने सुरु आहेत. आता जातीची बंधणे राहिली नाही. सर्व वसतिगृहात सर्व जाती-पातीची मुले शिक्षण घेत आहेत. मात्र गरजू, गरीब आणि प्रज्ञावान मुलांसाठी आजही ही वसतिगृहे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची व मानसिक बलस्थानाची केंद्रे आहेत. वसतिगृह चळवळीच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली केली. शिक्षण, आरक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण या उपाययोजनांद्वारे त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा एक नवा अध्याय लिहिला. म्हणूनच शाहू महाराजांना शिक्षणातून समाज परिवर्तन घडविणारे युगपुरुष म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. समाजाच्या प्रगतीचा खरा मार्ग शिक्षणातूनच जातो.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर ९७०२८५८७७७

# लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंती म्हणजे एक शैक्षणिक उत्सव



कोल्हापूर... म्हटलं की डोळ्यांसमोर येतो लोकराजा राजर्षी शाहू महाराज! आणि शाहू महाराज म्हणजे कोल्हापूर! हे समीकरण आता इतिहासाच्या सुवर्ण अक्षरात कोरलं गेलं आहे. 'लोकराजा' हा किताब त्यांना कोणी दिला नाही, तर लोकांच्या हृदयातून तो सहजच बाहेर पडला. लोकांच्या ठायी असणारा आपल्या राजाविषयीचा हा आदरभाव, त्यांची अथांग कीर्ती आणि त्यांचं आयुष्यभर चाललेलं अविरत कार्य, हे आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकणारा हा विशेष लेख आणि शैक्षणिक कार्याशी संबंधित असलेले त्यांची मोलाची भूमिका...

पुन्हा एकदा जागृती:

उत्साही आवाज, आणि युवा पिढीतील उर्जेची दृश्ये, पण आपण हे विसरता कामा नये! भारतीयांसाठी, विशेषतः बहुजन समाजासाठी झटणारा एकमेव राजा, ज्यांचे शैक्षणिक कार्य फार मोलाचे आहेत, त्यांचा विसर आपण पडू देऊ शकत नाही. शाळेचा पहिला दिवस म्हणजे शाहू महाराज यांची जयंती! आणि या दिवशी फक्त शाळा सुरू होणे नाही, तर एक शैक्षणिक उत्सव साजरा व्हायला हवा. या उत्सवातून शाहू महाराजांच्या जीवनावर, त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात यावा. त्यांच्या भाषणाने, त्यांच्या विचारांनी युवा पिढीला प्रेरणा मिळायला हवी. पुन्हा ढोल-ताशांचे सूर, आणि शाहू महाराजांच्या पुतळ्यासमोर वंदन करणारे लोक आज २६ जून म्हणजे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती! या पवित्र दिनी, आपण सर्वजण त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करूया आणि एक संकल्प करूया, की त्यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा आपण अविरतपणे पुढे चालवू. त्यांच्या वसतिगृहांच्या कल्पनेला, त्यांच्या सामाजिक समतेच्या विचारांना आपण जीवनात उतरवू. येणाऱ्या युवा पिढीला या महान लोकराजाचे शैक्षणिक कार्य, त्यांचे वसतिगृहांची निर्मिती, आणि त्यांचे सामाजिक कार्य समजायला हवे. त्यासाठी २६ जून हा फक्त एक दिवस न राहता, तो एक शैक्षणिक उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा. रयतेसाठी आयुष्यभर झटलेले लोकराजा राजर्षी शाहू महाराज! तुमच्या चरणी आमचे विनम्र अभिवादन!

**शैक्षणिक क्रांती :**
शाळेच्या वर्गातील आनंदी मुलं, आणि शाहू महाराजांच्या हस्ते पहिली वसतिगृहांची उद्घाटनं, शिक्षण क्षेत्रात शाहू महाराजांनी जी क्रांती घडवून आणली, ती भारत देशाच्या इतिहासात अभूतपूर्व होती. सर्व समाजातील, सर्व धर्मातील, सर्व जातींमधली भेदभाव दूर सारून, शिक्षणाची कवाडे सर्वांसाठी खुली करणारा असा हा एकमेव लोकराजा! वसतिगृहाची पहिली व्यवस्था मांडणारा, आणि शिक्षणाला खऱ्या अर्थाने सार्वजनिक बनवणारा राजा, म्हणजे छत्रपती शाहू महाराज! त्यांच्या या शैक्षणिक कार्याची प्रचिती भारत देशातील प्रत्येक नागरिकाला, प्रत्येक युवा पिढीला आहेच.

**दुर्दैवी विसर:**
थोडा गंभीर आवाज, आणि विदर्भातील कडाक्याच्या उन्हाची दृश्ये, पण दुर्दैवाने, गेल्या काही वर्षांपासून या लोकराजाचा विसर पडू लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. एकेकाळी त्यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण राज्यात शाळा सुरू केल्या जात होत्या. शाळेचा पहिला दिवस, म्हणजे शाहू महाराजांची जयंती! असं एक समीकरणच तयार झालं होतं. विदर्भामध्ये उन्हाची तीव्रता बघता, शाळा २६ जून रोजी, म्हणजेच शाहू महाराजांच्या जयंतीदिनी सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण, या निर्णयानंतर काही वर्षांपासून शाळेच्या पहिल्या दिवसाची तारीख वारंवार बदलण्यात आली. कधी १५ जून, कधी ३० जून, तर कधी १ जुलै, या सततच्या बदलामुळे काय झालं? तर शाळेचा पहिला दिवस आणि शाहू महाराजांची जयंती यांच्यातील तो पवित्र संबंध तुटून गेला. अनं नागरिकंमध्ये यावर चर्चा सुरू झाली, शंका कुशंका निर्माण झाल्या. असं वाटू लागलं, की या महान राजाच्या जयंतीचा आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याचा विसर पडावा, यासाठी तर हे बदल केले जात नाहीत ना?

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
मो. ९८२२६७४४८७

# सामाजिक समतेचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज...!

**आज २६ जून, २०२६, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती. त्यानिमित्त त्यांच्या स्मृतींना आणि क्रांतिकारी कार्याला विनम्र अभिवादन.**



रयतेचे राजे : छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून, १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत तर त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव व आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च, १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर त्यांचे नाव 'शाहू' ठेवले. त्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी कोल्हापूर संस्थानचे राजे म्हणून अधिकृतपणे राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. आपल्या राज्याभिषेकानंतर प्रथमत: त्यांनी संपूर्ण राज्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी लोकांची परिस्थिती, गरजा व त्यांची दुःखे जाणून घेतली. जनतेचे दुःख जाणून घेतल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्पृश्यता या तीन व्याधींनी समाजाला दुःखद जीवन जगण्यास भाग पाडले होते. म्हणून ह्या व्याधी निपटून काढल्या खेरीज प्रजेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाहीत, याची खूणगाठ बांधून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. त्यासाठी गावोगावी शाळा काढल्या, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले, पुरोहित शाळा सुरू केल्या. म्हणजे जनतेची काळजी घेऊन त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अश्या सगळ्या बाजूने उत्थान व्हावे यासाठी आपले राजे पद वापरणारे व राज्यकारभार करणारे ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते.

समतेचे पुरस्कर्ते : राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कार्यकाळात अस्पृश्यता निवारण करण्यासाठी फार मोठे धाडसी निर्णय घेतले. त्या काळी अस्पृश्यांना विद्येचा अधिकार तर नव्हताच; पण देवालये, चावड्या, सार्वजनिक पाणवठे आदी ठिकाणीही त्यांना प्रवेश नव्हता. ही अस्पृश्यता दूर करण्याचा प्रारंभ त्यांनी स्वतःपासून केला. अस्पृश्य तरुणांना मोटार ड्रायव्हिंगच्या कोर्सला पाठवून आपल्या दरबारी त्यांना गाडीवर नोकरीस ठेवले. इतकेच नव्हे तर अस्पृश्य समाजातील पट्टेवाले, शिपाई, डगलेवाले पोलीस, स्वतःचे शरीर-रक्षक म्हणूनही नियुक्त केले आणि थोडेसे शिक्षण झालेल्यां मागास व अस्पृश्य घटकातील लोकांना आपल्या राज्यात कारकून, रजिस्ट्रार, इत्यादी मानसन्मानाच्या जागा दिल्या. अस्पृश्यता व जातीभेद समाप्त व्हावा यासाठी त्यांनी इ .स. १९१७ मध्ये आपल्या संस्थांनामध्ये मिश्र विवाहांना मान्यता देणारा कायदा पास केला. तर अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. त्यामुळेच कृती आणि उक्तीचा मेळ घालून कार्य करणारा राजा म्हणून सर्वत्र त्यांची ख्याती पसरली होती.

कृतिशील लोकराजा : राजर्षी शाहू महाराजांची 'मणभर उपदेशापेक्षा कणभर कृती' अधिक महत्त्वाची असते यावर श्रद्धा होती. त्यांचे कार्य ङ'बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले?' या उक्तीला साजेसे होते. कारण त्यांनी स्वतः इंदूरच्या धनगर जमातीतील राजघराण्याशी आपल्या घराण्याचे सोयरसंबंध घडवून आणले. जातिभेद मोडण्यासाठीचा त्यांचा हा कृतिशील प्रयत्न होता. वरच्या जातीने खालच्या जातीतील कुटुंबाशी वैवाहिक संबंध जोडून जातिभेद मोडले पाहिजेत, असे त्यांना वाटे. म्हणून जातिभेद मोडण्यासाठी आंतरजातीय विवाह घडवून आणण्याचा प्रयत्न महाराजांनी आपल्या घरापासून सुरू केला होता.

**क्रांतिकारी निर्णय घेणारा धाडसी राजा** : राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. शाहू महाराजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून त्यांनी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढून त्या यशस्वीपणे चलविल्या. विशेष म्हणजे जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद करण्याचा क्रांतिकारी व धाडसी निर्णय घेतला.

**आरक्षणाचे जनक** : शाहू महाराजांनी आपल्या राज्यात बहुजन मागास, अस्पृश्य वर्गाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या आणि त्यांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठीही प्रोत्साहन दिले व त्यासाठी आर्थिक मदत केली. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन तर दिलेच पण राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले आणि स्वतः आपल्या सहकाऱ्यांसह त्यांच्या हॉटेलात चहापाणी घेण्यासाठी जात असत. याशिवाय अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान, चांभार यांना सरदार, अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या. अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून २६ जुलै, १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा करून त्याची त्वरित अंमलबजावणी सुरू केली. राजर्षी शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. मात्र शाहूंनी त्यांच्या विरोधाला चोख उत्तर देत आरक्षणाची गरज का? हे पटवून दिले. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून देणारे ते पाहिले राजे होते म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक म्हणतात.

राजर्षी शाहू महाराजांना फारच अल्प म्हणजे फक्त ४८ वर्षेच आयुष्य लाभलं. मात्र त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, कृषी, जलसिंचन, अस्पृश्यता निवारण, आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, कला, क्रीडा इत्यादी सर्वच क्षेत्रात फार मोठ्या सुधारणा व क्रांती घडवून स्वतःचे नाव अजरामर करून ठेवले. अशा या रयतेच्या राजाच्या स्मृतींना आणि त्यांच्या क्रांतिकारी कार्यकर्तृत्वाला कोटी कोटी प्रणाम.

**प्रा. डॉ.एम.आर.इंगळे**
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव डाटा अकोला

# मुहर्रम आणि हुतात्मा इमाम हुसेन (र)

इस्लाम धर्मानुसार इस्लामी वर्षाची सुरुवात मुहर्रम नावाच्या महिन्यापासून होते. प्रत्येक वर्षी कोट्यवधी मुस्लिम शिया व सुन्नी समुदायातील लोक इमाम हुसेन (र) यांच्या शहादतीचे स्मरण करून दुःख व्यक्त करतात.

परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, या विशाल सहानुभूती व्यक्त करणाऱ्यांपैकी फारच थोडे लोक या बलिदानामागील मूळ कारणांकडे लक्ष देतात किंवा त्या कारणांची माहिती करून घेतात. हजरत इमाम हुसेन (र) यांनी केवळ स्वतःचेच नव्हे तर आपल्या कुटुंबातील लहान मुलांचेही बलिदान दिले होते.

इस्लामी राज्यव्यवस्थेचे प्रवर्तक हजरत मुहम्मद (स) आणि त्यांच्या नंतर सत्तेवर आलेले चार खलीफा – हजरत अबूबकर सिद्दीक (र), हजरत उमर फारूक (र), हजरत उस्मान गनी (र) आणि हजरत अली (र) – हे सर्व सर्वसंमतीने निवडले गेले होते. इस्लामी राज्यघटनेचा मूलभूत आधार म्हणजे स्वतंत्र निवडणुकीद्वारे जनतेकडून प्रतिनिधीची निवड. सत्ता स्वीकारताना उमेदवाराच्या वैयक्तिक प्रयत्नांचा किंवा कटकारस्थानांचा संबंध नसे.



मात्र अमीर माविया सत्तेवर आले तेव्हा परिस्थितीत बदल होऊ लागला. अमीर माविया हे साहाबी असूनही त्यांच्या खलीफापदाबाबत काही मतभेद होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी आपल्या पुत्र यजीदला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले. यामुळे इस्लामी राजकीय व्यवस्थेत मोठा बदल घडून आला आणि वंशपरंपरागत राजसत्तेची सुरुवात झाली.

खलीफा हजरत उमर फारूक (र) यांचे चिरंजीव हजरत अब्दुल्ला हे अत्यंत विद्वान व गुणी व्यक्तिमत्त्व होते. अनेकांनी त्यांच्या निवडीची शिफारस केली होती; परंतु वारसाहक्काने खलीफा नेमण्याची प्रथा पडू नये म्हणून हजरत उमर (र) यांनी त्यास परवानगी दिली नव्हती.इमाम हुसेन (र) हे हजरत मुहम्मद (स) यांची सर्वात लाडकी कन्या हजरत फातिमा (र) आणि चौथे खलीफा हजरत अली (र) यांचे चिरंजीव होते. हजरत अली (र) यांच्या निधनानंतर इमाम हुसेन (र) यांचीही खलीफापदासाठी निवड होऊ शकली असती; परंतु इस्लाममध्ये वारसाहक्काने सत्ता देण्याची पद्धत नसल्यामुळे तसे झाले नाही.

अमीर मावियांनी आपल्या पुत्र यजीदला युवराज घोषित केल्यानंतर इमाम हुसेन (र) यांनी यजीदच्या सत्तेला मान्यता दिली नाही. त्यांनी यजीदच्या राजसत्तेविरुद्ध उभे राहण्याचा निर्णय घेतला आणि त्या निर्णयाच्या परिणामांना धैर्याने सामोरे गेले. त्यांचे मत असे होते की, इस्लामी राज्यव्यवस्थेचे जतन करणे हे मुस्लिम समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. इस्लामी शासनपद्धतीत झालेला हा बदल इस्लामच्या मूलभूत तत्त्वांसाठी गंभीर धोका होता. हा धोका दूर करण्यासाठी आवश्यक असेल तर सर्वस्वाचा त्याग करण्यासही ते तयार होते. या दृढ निश्चयाने इमाम हुसेन (र) यांनी यजीदच्या सैन्याशी संघर्ष केला आणि या संघर्षात त्यांनी केवळ स्वतःचेच नव्हे तर आपल्या कुटुंबातील अनेक सदस्यांचेही बलिदान दिले.

काही लोक इमाम हुसेन (र) यांच्या बलिदानाकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून पाहू शकतात; परंतु त्यांच्या दृष्टीने ते एक धार्मिक कर्तव्य होते. इस्लामच्या मूलतत्त्वांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी प्राणार्पण केले आणि शहादत स्वीकारली. म्हणूनच त्यांचे बलिदान आजही सत्य, न्याय आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक मानले जाते.

**इद्रीस खान**
९४२२१९२९५४

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार दि. २६ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध जाहीर

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख विभागातील पदांच्या सुधारीत आकृतीबंधानुसार आता जिल्हा पातळीवर पदांचे नवीन वाटप निश्चित करण्यात आले आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे कार्यालयाकडून या नवीन रचनेनुसार अकोला जिल्ह्यातील नगर भूमापन अधिकारी कार्यालय आणि विविध तालुक्यांतील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयांची सुधारित पदसंख्या आणि संरचना आता स्पष्ट झाली आहे.

नगर भूमापन अधिकारी कार्यालय, अकोला (न.भू.अ. अकोला)अकोला शहरातील नागरीकरणाचा वेग आणि कामाचे स्वरूप विचारात घेऊन सुधारित आकृतीबंधानुसार नगर भूमापन अधिकारी (अकोला) कार्यालयाची एकूण १७ पदांची आस्थापना निश्चित करण्यात आली आहे. नगर भूमापन अधिकारी: १

## नगर भूमापन आणि उपअधीक्षक कार्यालयातील पदांचे अंतिम वाटप

पद (नियमित) शिरस्तेदार: २ पदे (नियमित) परिरक्षण भूमापक : ८ पदे (नियमित) भूकरमापक: २ पदे(नियमित) शिपाई: ४ पदे मंजुर करण्यात आली.

अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या उपअधीक्षक कार्यालयांचाही आढावा घेऊन तेथील कामाच्या प्रमाणानुसार एकूण पदांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. स्वामित्व प्रकल्पामुळे वाढलेल्या मिळकती आणि नागरी भागातील वाढते कामकाज पाहता, प्रत्येक उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात १ परिरक्षण भूमापकाचे नवीन पद मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय जुन्या आकृतीबंधातील दुरुस्ती लिपिक, आवक-जावक लिपिक यांची कामे आता परिरक्षण भूमापक व भूकरमापकांकडे सोपवून कार्यालयांचे सक्षमीकरण करण्यात आले आह

अकोला येथे 'विशेष उपअधीक्षक' कार्यालयाचे मुख्यालयात गावठाण आणि शहर मापन कामांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शासनाने स्वतंत्र निर्णय घेतला आहे. यानुसार विशेष उपअधीक्षक भूमि अभिलेख (न.भू./गावठाण/चौकशी अधिकारी), अकोला हे नवीन मुख्यालय निश्चित करण्यात आले आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र अकोला व वाशीम या दोन्ही जिल्ह्यांसाठी एकत्रित असणार आहे. या विशेष कार्यालयामध्ये एकूण १२ पदांची आस्थापना असेल, ज्यामध्ये १ विशेष उपअधीक्षक, १ शिरस्तेदार, १ परिरक्षण भूमापक, ६ भूकरमापक आणि ३ शिपाई पदांचा समावेश आहे. जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल (भा.प्र.से.) यांनी सर्व प्रादेशिक उपसंचालकांना या सुधारित आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेची व कार्यालये कार्यान्वित करण्याची कार्यवाही तात्काळ करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे अकोला जिल्ह्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे आणि नगर भूमापनाच्या कामाला मोठी गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## हातरुण मध्ये मोहरम सण शांततेत व पारंपरिक पद्धतीने साजरा

प्रतिनिधी २६ जून

**हातरुण :** मोहरम सण शांततेत आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. यासाठी शांतता समितीची बैठक शुक्रवारी ग्राम पंचायत येथे आयोजित करण्यात आली. उरळ पोलिस स्टेशनचे ठाणेदार जनार्दन खंडेराव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. मोहरम कमिटीचे अध्यक्ष विविध समाजातील मान्यवर, लोकप्उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मोहरम सण आपसी बंधुभाव, सामाजिक सलोखा आणि शिस्त राखून साजरा करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला. यावेळी शाहरूख पढाण शेख आरीफ शेख युसुफ . मंजुर शाह गजानन नसुर्डे जाकीर खान दामुमाळी . राजीक शाह आसीफ कुरेशी . मंडळ ध्यक्ष होत दरम्यान ढाणेदार यांनी मोहरम तसेच आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे आणि सर्व धर्मीयांनी एकमेकांच्या भावना जपत सण उत्सव साजरे करावेत, असे सांगितले.

यावेळी हातरुण बिट जमादार विजय चव्हाण रघुनाथ नेमाडे उपस्थित होते.

# देशमुख महिला मंडळाची मासिक सभा संपन्न




प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** देशमुख महिला मंडळातील बनारसी ग्रुपच्या वतीने जून महिन्याची मासिक सभा उत्साहात संपन्न झाली. यावेळी वाराणसीच्या संस्कृतीची झलक बनारसी ग्रुपच्या सख्यांनी सादर केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी आमदार प्रा. बी .टी. देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दीप प्रज्वलन, प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

व्यासपीठावर मंडळाच्या अध्यक्षा राजश्रीताई, ज्येष्ठ सल्लागार कविता ताई, प्रमुख पाहूण्या वंदना युवराज, कोषाध्यक्ष प्रतिभाताई, ग्रुप लीडर विजयाताई यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कविता ताईंनी केले तर बाल संस्कार शिबिरात राबविलेल्या उपक्रमाविषयीची माहिती ज्योतीताईंनी दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उज्वला यांनी करून दिला. प्रमुख पाहूण्या वंदना ताईंनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षा राजश्रीताईंनी आगामी उपक्रमांबद्दल माहिती सांगीतली, त्याचप्रमाणे मंडळातील सख्यांच्या दहावी व बारावीतील गुणवंत पाल्यांचा कौतुक सोहळा समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमेय , धनश्री , रूपम , स्वरा , राघवेंद्र , अवधूत , केतकी , सई , आयुष , हर्षाली ,ऋतुराज,स्वामी इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात आला. तसेच वटसावित्रीच्या सणाचे औचित्य साधून आधुनिक सावित्री सौ अरुणा देशमुख यांच्या त्याग व समर्पणाची दखल घेत बनारसी ग्रुप तर्फे सत्कार करण्यात आला.

### बनारसी ग्रुप तर्फे पर्यावरण दिन योग दिन साजरा

'पाऊस धारा' या थीम अंतर्गत उज्वला, वैशाली, शिवानी, संध्या, मंजू, विजया, शुभांगी, दिप्ती, भावना, प्रिया, सिद्धी यांनी बहारदार गाण्यांवर नृत्य सादर केले. यावेळी उपस्थित सख्यांसाठी विविध स्पर्धा व खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ड्रेस कोड च्या विजयी सख्या आहेत अनुराधा, दीप्ती, स्वप्ना, ममता, सारिका, अपेक्षा. तसेच चिठ्ठी गेम मध्ये वसुधा, कल्पना, नीता, सुजाता, सारिका, साधना, नभा, शालिनी, शितल, स्नेहल या विजेता आहेत. तसेच हाऊजी गेमच्या विजेत्या आहेत यक्ष्मा,संगीता, साधना, रेवती, विद्या, मंजू, रेवती, संगीता, उज्वला, अर्चना, अनिता, मंजू, अनिता. मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या स्त्री रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी अन्नदानाच्या उपक्रमांतर्गत मदत करणाऱ्या सौ. आशा थोरात यांचा सत्कार मंडळातर्फे घेण्यात आला. तसेच योगादिन नीमीत्त 'करा योग रहा निरोग' या संकल्पनेनुसार ?ड. कांचन शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सूत्र संचालन डॉ. शिवानी व भावना यांनी केले तसेच बनारसी ग्रुपच्या सदस्याच्या कार्याची ओळख मंजुषा यांनी करून दिली. आभार प्रदर्शन स्मिता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बनारसी ग्रुपच्या सदस्य कविता ढोरे, संध्या , ज्योती , विजया , मंजुषा , अनघा , शुभांगी मीना, उज्वला , वैशाली , डॉ. शिवानी ,दिप्ती , भावना , प्रिया , संध्या ,स्मिता , सिद्धी यांनी परिश्रम घेतले.

# कॉंग्रेस नेते हिदायतउल्ला पटेल खून प्रकरणात दोन संशयीत आरोपींचा अटकपूर्व जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. बी.एम. पाटील यांनी कॉंग्रेस नेते हिदायत पटेल हत्या प्रकरणात संशयीत आरोपी पटेल फाजील खाँ आसीफ खाँ व फारुख खाँ आसिफ खाँ पटेल राहणार मोहाळा यांचा अटकपुर्व जमानत अर्ज नामंजूर केला.

या प्रकरणात वरील दोन्ही आरोपींनी अटकपुर्व जमानत मिळण्याकरिता अर्ज दाखल केल्यानंतर सरकारतर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात युक्तीवाद केला की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा आहे असन सदर गन्हा हास्खल आहे त्या तारखेपासुन गुन्हयातील संशयीत अर्जदार दोन्ही आरोपी हे फरार आहेत व त्यांनी आपले मोबाईल बंद करुन ठेवले आहे.

गुन्ह्यातील संशयीत दोन्ही अर्जदार आरोपीनी गुन्हयात अटक असलेला आरोपी उबेद खॉ पटेल राजीक उर्फ कालु खाँ पटेल यास गुन्हा करण्याकरीता कशाप्रकारे व कोणते आमीष देवुन प्रवृत्त केले याबाबत सखोल तपास करायचा आहे. गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून आरोपीला जामीन मिळाल्यास तो फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर दबाव किंवा धाकधापट करुन तपासात अडथळा आणु शकतो. वरील सर्व मुद्दे लक्षात घेता संशयीत आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर करण्यात यावा असा युक्तिवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी केला. फिर्यादी तर्फे ॲड. मुन्ना खान व ॲड. श्रीरंग तट्टे यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर कोर्टाने दोन्ही संशयीत आरोपींचा अटकपुर्व जमानत अर्ज २४ जून रोजी नामंजुर केला.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील मुद्रांक कलेक्टर एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी २६ जून



**अकोला :** अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील मुद्रांक कलेक्टर किरण चौधरी यांना अँटी करप्शन ब्युरो अकोलाच्या पथकाने लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. गुरूवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

अकोला एमआयडीसी मध्ये प्लॉटचे डिव्हायडेशन झाल्यानंतर सदरचा प्लॉट पत्नीच्या नावावर करून देतो यासाठी दहा हजाराची लाच मुद्रांक कलेक्टर यांनी मागितली होती.

याबाबत फिर्यादीने अँटी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिल्यानंतर आज मुद्रांक कलेक्टर यांना त्यांच्याच कार्यालयातून अँटी करप्शन ब्युरोने अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे. वरिष्ठ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.

# मान्सूनच्या आगमनाने पातुर परिसरात पेरणीला वेग



प्रतिनिधी २६ जून

**पातुर :** पातुर तालुक्यात मान्सूनचे समाधानकारक आगमन झाल्यानंतर शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतजमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने बळीराजा उत्साहाने शेतात उतरल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे. मात्र, वाढत्या डिझेल दरांचा शेतीच्या खर्चावर मोठा परिणाम होत असल्याने काही शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरऐवजी बैलजोडीच्या साहाय्याने पारंपरिक पद्धतीने पेरणी करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे इंधन खर्चात बचत होत असून पारंपरिक शेती पद्धतीचे महत्त्वही अधोरेखित होत आहे. सध्या शेतकरी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आदी खरीप पिकांच्या पेरणीत व्यस्त असून यंदा मान्सूनची साथ कायम राहिल्यास चांगल्या उत्पादनाची आशा व्यक्त केली जात आहे. कृषी विभागानेही हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन योग्य बियाणे, खतांचा संतुलित वापर आणि शिफारशीनुसार पेरणी करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले आहे. पातुर तालुक्यात सध्या शेतशिवारात सर्वत्र पेरणीची लगबग सुरू असून, यंदाचा खरीप हंगाम भरघोस होण्याची अपेक्षा बळीराजामध्ये व्यक्त होत आहे.

# सावरगाव ते वणी-वारुळा रस्ता त्वरित दुरुस्त न झाल्यास तहसील कार्यालयावर महिलांचा मुक्काम



प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** सावरगाव ते वणी-वारुळा रस्ता काही वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्याच्या कामाचा प्रशासनाकडून मूहुर्तच निघाला नाही. हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक अंतर्गत डांबर रस्ता तयार झाला. परंतु काम अर्धवट राहिले. काम त्वरित झाले नाही तर महिला आंदोलन करतील असा इशारा दिला आहे.

सावरगावातील सुरेश नारे यांच्या शेतातून रस्ता होता परंतु नारे यांनी भूमिअभिलेक कार्यालयाकडून मोजणी केली असता नकाशा प्रमाणे हा रस्ता खापरवाडी वरूळ येथील शेतकऱ्यांच्या शेतातून निघाला. मोजणीच्या वेळी या कोणत्याही शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला नाही असे सांगण्यात येते. शेतकऱ्यांचा आक्षेप नसल्यामुळे दोन दिवस रस्ता सुरळीत होता. मागच्या आठवड्यात तहसीलदार, मंडळ अधिकारी ग्रामसेवक सरपंच ग्रामपंचायत सदस्य व भूमी अभिलेख कार्यालया मार्फत रस्ता मोजून शासनामार्फत रस्ता तयार केला. ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून रस्ता गेला त्या शेतकऱ्यांनी रस्ता बंद करून, नाली खोदून स्वतः च्या मनाने रस्ता काढून दिला. असे रोज चालू आहे. आज एक शेतकरी तर दुसऱ्या दिवशी दुसरा शेतकरी वाट करतो. त्यामुळे शाळकरी मुले, दुग्ध व्यावसायिक आणि सावरगाव येथील गावकऱ्यांचे जाणे येणे कठीण झाले आहे. तसेच शेतकरी दररोज वाद करत आहेत.

त्यामुळे जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. रस्त्याची शाहनिशा करून संबधित रस्ता जाणे येणे करीता पक्का तयार करून देण्यात यावा. अन्यथा समस्त सावरगाव गावकरी आपल्या तहसील कार्यालय येथे मुक्काम आंदोलन करू यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा दिला.

# बाळापुरात मोहरम निमित्त सवारी उत्सव जामोदे परिवाराकडून उत्सवाची परंपरा कायम

**बाळापुर :** शहरात गुरुवार २५ व शुक्रवार २६ जून रोजी मोहरम निमित्त सवारी उत्सव साजरा केला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जामोदे परिवाराकडून हा उत्सव साजरा केला जातो.



शहरातील लाल सवारी चौकातील लाल सवारी म्हणून प्रसिद्ध असलेली धोबीची लाल सवारी म्हणून या सवारीची ओळख आहे. स्व. राजाराम जामोदे, बळीराम जामदे, जयराम जामोदे यांचे मामा स्व. अंबुजी मोकळकर यांच्या मांडीवर आपोआप लाल सवारीचे आगमन झाले होते. तेव्हापासून ही लाल सवारी 'धोबी की सवारी' म्हणून ओळखल्या जाते. गेल्या काही वर्षांपासून लाल सवारी म्हणजे मोठी सवारी व छोटी सवारी ही धोबी बांधवांच्या घरांच्या बाजूला बंगल्यामध्ये बसत होती. परंतु काही कारणास्तव सवारी त्या ठिकाणी बसत नसल्यामुळे आता परंपरेनुसार छोटी सवारी जामोदे कुटुंबीयांकडे आहे. जुन्या वारसा प्रमाणे स्व. जयराम जामोदे यांच्या निवासस्थानी त्यांचे सुपुत्र सुरेश उर्फ बंडू जामोदे, स्व. बळीराम जामोदे यांचे सुपुत्र देविदास जामोदे व त्यांची मुले, नातवंडे हा वारसा त्यांच्या निवासस्थानी परंपरेनुसार चालवत आहेत. सध्या मोहरम सुरू असून जामोदे कुटुंबीयांनी त्यांच्या निवासस्थानी लाल सवारीचे आगमन करून परंपरा जोपासली आहे.

तर या लाल सवारीची पहिल्या पासुन छोटी लाल सवारी उठविणारे सादीका पहेलवान हे सवारी उठुन उत्सव साजरा करत असता.तर या छोटी लाल सवारी बसल्यामुळे या चौकांमध्ये रौनक आली असुन तर दुरुन दुरुन तसेच बाहेरगाव वरुन भक्तगण सवारीचे दर्शन घेण्यासाठी येतात हे विशेष.

## जाहीर नोटीस

प्रो.नं./४७२/२०२६ दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर,दि.२०/०६/२०२६

**वि. सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क्र. २४८/२०२६** **ने.ता. २४/०७/२०२६**

**अर्जदार: १) मंदाबाई गणेशराव देवके,** वय अं. ७६ वर्षे, धंदा- घरकाम

**२) प्रदीप गणेशराव देवके,** वय अं.४६ वर्ष, धंदा- शेती

अ.क्र. १ व २ रा. गोळेगाव, पो. शिवर, ता. दर्यापूर, जि. अमरावती

**३) अलका माधवराव गोमासे,** वय अं. ५४ वर्ष, धंदा- घरकाम

रा. कसबेगव्हाण, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

**४) सुनंदा सतीश निचळ,** वय अं. ४४ वर्ष, धंदा- घरकाम

रा. कुरुम, पो. राजनापूर खिनखिनी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला

**- विरूद्ध -**

**गैरअर्जदार:**

**निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गणेश सदाशिवराव देवके** हे दिनांक २१/०४/२०२६ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VII)१८२७ चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा, अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

# पहिल्याच मुसळधार पावसात अकोटची जलनिस्सारण व्यवस्था कोलमडली



वि. प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** अकोट शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने नगर परिषदेच्या जलनिस्सारण व्यवस्थेची पोलखोल केली. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई मोहीम राबविण्यात आली असली तरी नाल्यांवरील अतिक्रमणे हटविणे आणि संपूर्ण साफसफाई करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, पहिल्याच जोरदार पावसात शहरातील अनेक भाग जलमय झाले असून काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली.

शहरातील नरसिंग मंदिर रोड, यात्रा चौक, कालंका माता चौक तसेच इतर सखल भागांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले. नाल्यांमधून पाण्याचा निचरा न झाल्याने रस्त्यांवरून पाणी वाहू लागले. काही भागांतील घरांमध्येही पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. घरगुती साहित्य, धान्य व इतर वस्तूंचे नुकसान झाल्याची माहिती रहिवाशांनी दिली. नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, गाळ व इतर कचरा साचल्याने पाणी साचले. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी लाखो रुपये खर्च करून नालेसफाई केल्याचा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात अनेक नाल्यांमध्ये गाळ, कचरा आणि प्लास्टिकचा साठा कायम असल्याने चित्र दिसून आले आहे. पहिल्याच पावसात शहरातील प्रमुख रस्ते आणि चौक जलमय झाल्याने नगर परिषदेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शिवसेनेचे वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष रोशन पर्वतकर यांनी परिस्थितीची तक्रार केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी पूरबाधित भागांची पाहणी केली. गांधी मैदान ते खानापूर वेस दरम्यानच्या मुख्य नाल्यात कचरा अडकून पाणी रस्त्यावर वाहत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित विभागाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. स्थळ पाहणीनंतर शहरातील सर्व लहान-मोठ्या नाल्यांची जेसीबीच्या साहाय्याने सखोल साफसफाई करण्याचे आदेश मुख्याधिकाऱ्यांनी दिले. तसेच पाणी ओसरल्यानंतर बाधित भागांमध्ये जंतुनाशक फवारणी व ब्लिचिंग पावडर टाकण्याचे काम युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**प्लास्टिक बंदीचा फज्जा?**

राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी लागू असतानाही अकोट शहरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा आढळून आला. यामुळे नाल्यांचा प्रवाह अडथळला जाऊन पाणी साचल्याचे चित्र दिसून आले.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २६ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# अवैध सावकारीविरोधात धाड; सात आक्षेपार्ह दस्तऐवज जप्त

प्रतिनिधी २६ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत सहकार विभागाच्या विशेष पथकाने गुरुवारी कृष्णकुंज नगर, आमराई, वडगाव रोड परिसरात धाड टाकून सात आक्षेपार्ह दस्तऐवज जप्त केले. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. वाय. पी. परळीकर यांच्या निवासस्थानी झडती घेण्यात आली. अशोक उत्तमराव दिघाडे यांनी २२ जून रोजी परळीकर हे अवैध सावकारी व्यवसाय करीत असल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तक्रारीची पडताळणी करण्यासाठी २५ जून रोजी विशेष पथकाने ही कारवाई केली.

झडतीदरम्यान जप्त करण्यात आलेल्या सात दस्तऐवजांची सखोल पडताळणी करण्यात येणार असून, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदींनुसार पुढील कायदेशीर कारवाई प्रस्तावित असल्याची माहिती सहायक निबंधक तथा तालुकास्तरीय समन्वय समितीच्या सदस्य सचिवांनी दिली.

सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक रिता निनावे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली होती.

पथकात सहाय्यक निबंधक व्ही. के. हिरूळकर (दारव्हा), एस. डब्ल्यू. खरतडे, रोशन गाडे, विद्या भोवते, के. एस. मारसट्टीवार, अनिल मामीडवार, पी. एन. चव्हाण तसेच तलाठी आकाश दर्शनवार यांचा समावेश होता.

पोलीस प्रशासनाकडून पीएसआय यु. के. परांडे, आर. बी. गुजर, पी. बी. राठोड तसेच व्हिडिओ फोटोग्राफर यांनीही कारवाईत सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, पोलीस निरीक्षक अजित कदम आणि तालुकास्तरीय प्रशासकीय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार, महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

## गढूळ पाणी पुरवठ्यामुळे रोष

प्रतिनिधी २६ जून

**बाभूळगाव :** शहरातील नागरिकांना नळ योजनेद्वारे गढूळ पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पहिला पाऊस कोसळला आणि नळाद्वारे दुर्गंधीयुक्त पाणी नागरिकांच्या घरात पोहोचले. या पाण्यामुळे विविध आजार होण्याची भीती निर्माण झाली आहे.

शहराला नांदुरा बुद्रुक येथील बेंबळा नदीवरून पाणीपुरवठा केला जातो. बेंबळा नदीपात्राच्या मधोमध विहीर खोदून पाण्याची साठवणूक केली जाते. त्यानंतर विहिरीतील पाणी नांदुरा येथील नदी काठावर असलेल्या विहिरीत आणले जाते. तेथून पाणी पाइपलाइनद्वारे बाभूळगाव येथे आणून फिल्टर केले जाते व नळ सोडण्यात येते.

परंतु, फिल्टर मशीन असताना पाऊस कोसळताच गढूळ पाण्याचा पुरवठा झाल्याने रोष व्यक्त होत आहे. शहराला स्वच्छ पाणी पुरवण्याची जबाबदारी नगरपंचायतीची आहे. मात्र मुख्याधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने कामकाजावर कुठलेही नियंत्रण नाही. त्यातच दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा झाल्याने साथरोग येण्यापूर्वी आरोग्य विभागाने पाणी नमुने घ्यावे, अशी मागणी होत आहे.

# संजय राठोड यांच्याकडे डीएनटी समाजाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची धुरा

### शिंदे सेनेचा ऐतिहासिक निर्णय

प्रतिनिधी २६ जून

**यवतमाळ :** विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या जमाती (डीएनटी) समाजाच्या सक्षमीकरणासाठी शिवसेनेने महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे मंत्री संजय राठोड यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्वाची जबाबदारी सोपविली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आल्याचा दावा पक्षाने केला असून, डीएनटी समाजाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

देशातील विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाची लोकसंख्या १० ते १२ कोटींच्या घरात असून, महाराष्ट्रात सुमारे दीड कोटी नागरिक या प्रवर्गात येतात. मात्र, शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास, जातप्रमाणपत्र, आरक्षण आणि इतर मूलभूत सुविधांच्या बाबतीत हा समाज अद्याप मागे असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



राज्यातील डीएनटी प्रवर्गामध्ये बंजारा, लमाण, बेरड, रामोशी, भामटा, कंजारभाट, पारधी, वडार, कैकाडी, गोसावी, बेलदार, गारुडी, घिसाडी, गोंधळी, कोल्हाटी, डोंबारी, वैदू, वासुदेव, बहुरूपी, शिकलगार यांसह अनेक समाजांचा समावेश होतो. या सर्व घटकांना एकत्रित नेतृत्व व संघटनाची आवश्यकता लक्षात घेऊन संजय राठोड यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे पक्षाने म्हटले आहे. पुढील काळात राज्य व देशभरात डीएनटी समाजाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हा व तालुकास्तरावर संघटन उभारणे, युवक व महिलांना नेतृत्वात संधी देणे तसेच समाजाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्यावर भर दिला जाणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, ही नियुक्ती कोणत्याही राजकीय समीकरणांपेक्षा अनेक वर्षांपासून उपेक्षित राहिलेल्या समाजाला न्याय व प्रतिनिधित्व मिळवून देण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचा दावा शिवसेनेने केला आहे. संजय राठोड यांच्या नेतृत्वामुळे डीएनटी समाज अधिक संघटित व सक्षम होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# 'देव' उदार झाला, हाती महामंडळ रुपी भोपळा दिला!

प्रतिनिधी २६ जून

### अधिवेशनात प्रश्न गाजणार?

■ सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आर्य वैश्य समाजाच्या महामंडळाचा प्रश्न उपस्थित होणार का? निधी कधी मिळणार आणि महामंडळ प्रत्यक्षात कधी कार्यान्वित होणार? याकडे राज्यातील लाखो समाज बांधवांचे लक्ष लागले आहे. सध्या तरी परिस्थिती अशी आहे की, महामंडळाची घोषणा झाली, योजना जाहीर झाल्या; मात्र निधी नाही, कार्यालय नाही, गरजूंना लाभ नाही. त्यामुळे समाजात एकच उपरोधिक चर्चा सुरू आहे, “देव उदार झाला, अन् हाती महामंडळरूपी भोपळा दिला!”

### सरकारची भूमिका पक्षपाती?

■ ज्या समाजाने स्वतंत्र महामंडळासाठी तब्बल दहा वर्षे संघर्ष केला, त्याच समाजाच्या महामंडळाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप संघर्ष समितीने केला आहे. ब्राह्मण समाजाच्या महामंडळाला प्राधान्य देऊन आर्य वैश्य समाजाचे महामंडळ निधी अभावी रखडविणे ही पक्षपाती भूमिका असल्याची भावना समाजामध्ये तीव्र होत आहे. शासनाच्या या भूमिकेच्या निषेधार्थ आर्य वैश्य समाजाच्या वतीने थेट मंत्रालया समोर आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निवासस्थाना समोर घंटा नाद आंदोलन करून या अन्यायाला वाचा फोडण्यात येणार असल्याचा इशारा आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्राचे अध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांनी दिला आहे.

**यवतमाळ :** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी सप्टेंबर २०२४ मध्ये राज्य शासनाने जवळपास दीड डझन आर्थिक विकास महामंडळांची घोषणा केली होती.

मात्र, दोन वर्षांचा कालावधी उलटत आला तरी त्यापैकी केवळ तीन महामंडळेच कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सरकारने सुरू केली असून त्यातीलही फक्त ब्राह्मण समाजाचे श्री परशुराम आर्थिक विकास महामंडळ हेच प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात आले आहे.

राजपूत समाजासाठी स्थापन करण्यात आलेले वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य (कोमटी) समाजासाठी स्थापन करण्यात आलेले श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असली तरी ही महामंडळे अद्याप ही कार्यान्वित करण्यात आली नाहीत. त्यामुळे आर्य वैश्य (कोमटी) समाजामध्ये असंतोषाची लाट धुमसत आहे.

राज्य शासनाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी अध्यादेश काढून या महामंडळांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ‘अमृत’ योजनेच्या धर्तीवर व्यक्तिगत कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना लागू केल्या. मात्र, योजना जाहीर होऊन जवळपास वर्ष उलटत आले तरी एकाही गरजुला याचा लाभ मिळालेला नाही.

**दहा वर्षांचा संघर्ष, तरीही उपेक्षा :** आर्य वैश्य (कोमटी) समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्राच्या वतीने २०१६ पासून सातत्याने करण्यात येत आहे. या मागणीच्या पूर्ततेसाठी संघर्ष समितीच्या वतीने राज्यभर आंदोलने, निवेदने, मोर्चे अशा विविध लोकशाही मार्गांनी पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर कुठे या समाजाला न्याय मिळाला, तो ही फक्त कागदोपत्री! शासनाने श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले. मात्र प्रत्यक्षात निधी आणि यंत्रणाच उपलब्ध करून दिली नाही, असा आरोप आर्य वैश्य समाजाकडून केला जात आहे.

महामंडळासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे सरकारने जाहीर केले होते. मात्र हा निधी प्रत्यक्ष महामंडळाकडे वर्ग करण्यात आला नसल्याचे कळते. इतकेच नव्हे तर महामंडळाचे स्वतंत्र कार्यालय देखील अद्याप सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे आर्य वैश्य समाजाकडून “सांगा देवेंद्रजी, आमचे दहा कोटी गेले कुठे?” असा प्रश्न करत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. आंदोलन, निवेदने आणि माध्यमांमधून आवाज उठवल्यानंतर शासनाने मंजूर निधीपैकी केवळ ५० लाख रुपये महामंडळाकडे वर्ग केल्याचे सांगितले जाते. पण त्या निधीचा उपयोग झाल्याचे दिसत नसल्याने अर्थसंकल्पित निधीचे काय झाले? असा प्रश्न आर्य वैश्य संघर्ष समितीच्या वतीने उपस्थित केला जात आहे.

# ४८ रुग्ण मोफत शस्त्रक्रियेसाठी नागपूरला रवाना



प्रतिनिधी २६ जून

### ‘मानव सेवा हिच ईश्वर सेवा’

■ ‘८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण’ या सूत्रानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेना दरवर्षी राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविते. मागील तीन वर्षांत आर्णी शहरात मनसेच्या माध्यमातून सुमारे २०० नागरिकांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांचे मनसेच्या वतीने आभार मानण्यात आले, अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष सचिन यलगंधेवार यांनी दिली.

**आर्णी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आर्णीच्या वतीने पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य नेत्रतपासणी व मोतीबिंदू शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरातून निवड झालेल्या ४८ गरजू रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथील डॉ. महात्मे हॉस्पिटलमध्ये रवाना करण्यात आले.

दि. १९ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात सुमारे २८० नागरिकांनी सहभाग नोंदविला. तपासणीनंतर १३८ नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच काही रुग्णांना डोळ्यांचे ड्रॉप्स व आवश्यक औषधांचेही वितरण करण्यात आले.

रुग्णांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने मनसेच्या वतीने त्यांना मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे अनेक गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

या शिबिरासाठी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन यलगंधेवार, शहराध्यक्ष कपिल ठाकरे, आकाश माटलवाड, शुभम मोरे, पंकज रत्ने, संदीप गाडगे, अक्षय मारशेटवार, महेश बांते आणि गौरव बाबरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# परवेज लाला याला अटक न झाल्यास २ जुलैला उमरखेड बंद : शिवसेनेचा इशारा



प्रतिनिधी २६ जून

**उमरखेड :** शिवसेनेचे कार्यकर्ते रमेश गुलाबसिंग चव्हाण यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचा आरोप असलेल्या परवेज ऊर्फ लाला सलीम खान याला तातडीने अटक करावी, अन्यथा २ जुलै रोजी उमरखेड बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री, पालकमंत्री, पोलीस अधीक्षक व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, १६ जून रोजी रमेश चव्हाण यांच्यावर लोखंडी रॉड व चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणात काही आरोपींना अटक झाली असली तरी परवेज लाला अद्याप फरार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींनी चौकशीत त्याच्याच सांगण्यावरून हल्ला केल्याची कबुली दिल्याचा दावाही शिवसेनेने केला आहे.

उमरखेड परिसरात अवैध रेती उत्खनन, मटका, जुगार व गांजाच्या वाढत्या धंद्यांमुळे माफियांचे जाळे मजबूत होत असल्याचा आरोप करत संपूर्ण साखळीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी शहरप्रमुख ॲड. संजीवकुमार जाधव, महिला शहरप्रमुख सपना चौधरी, माजी उपजिल्हाप्रमुख कैलास कदम (केके), उपशहरप्रमुख बसवेश्वर शिरसागर, शेख इरफान, सुनील शहाणे, जसविन घनगाव, संदीप कोकाटे, सुरेश ठाकरे, वसंतराव देशमुख, विनायक बोरकर, योरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवाजी महाराज स्मारकाच्या अनावरणासाठी आमरण उपोषण

प्रतिनिधी २६ जून




**उमरखेड :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे अनावरण तातडीने करण्यात यावे आणि स्मारक परिसरातील कथित नियमबाह्य पेट्रोल पंप हटविण्यात यावा, या मागणीसाठी शिवप्रेमी तथा मराठा सेवा संघाच्या वतीने सौ. सरोजताई नंदकुमार देशमुख यांनी गुरुवारपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, स्मारकाच्या अनावरणासाठी अनेक वर्षांपासून निवेदने, आंदोलने आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

उपोषणाच्या पहिल्याच दिवशी शिवप्रेमी, मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला. स्मारक परिसरातील कथित अतिक्रमणाबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित पेट्रोल पंपावर कारवाई का होत नाही, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

प्रशासनाने या प्रकरणात आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी, कार्यवाहीस नेमका विलंब का होत आहे याची माहिती द्यावी आणि स्मारकाच्या अनावरणासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असून त्यांच्या स्मारकासाठी उपोषण करण्याची वेळ येणे दुर्दैवी असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, स्मारकाच्या अनावरणाबाबत ठोस निर्णय आणि कथित अतिक्रमणाबाबत कारवाई होईपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# कृषी दिनानिमित्त मुंबईत प्रयोगशील शेतक-यांचा गौरव

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

प्रतिनिधी २६ जून



**पुसद :** कृषी दिनानिमित्त राज्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा भव्य पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री इंद्रनील नाईक यांनी दिली.

मुंबईतील मंत्रालय विधिमंडळ पत्रकार संघाच्या पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आणि कृषी दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात राज्यभरातील प्रयोगशील व नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव केला जाणार आहे. तसेच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात येणार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

महाराष्ट्रात स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून उत्साहात साजरी केली जाते. या निमित्ताने वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानतर्फे गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत सातत्याने पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. शेतकऱ्यांच्या नावीन्यपूर्ण प्रयोगांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे नाईक यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेला प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र बारवाले, सचिव दीपक पाटील, विश्वस्त मुश्ताक अंतुले यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरक्षण निश्चितीत लोकसंख्येला प्राधान्य द्या

### बहुजन मुक्ती पार्टीचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी २६ जून




**आर्णी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील आरक्षण निश्चिती करताना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या वॉर्डनिहाय लोकसंख्येचा विचार करूनच आरक्षण निश्चित करावे, अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीने केली आहे. यासंदर्भातील निवेदन सोमवारी आर्णी तहसील कार्यालयात सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधानातील कलम 14, 15(4), 15(5), 17, 38, 46 आणि 243D नुसार वंचित घटकांना प्रभावी आणि अर्थपूर्ण राजकीय प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. मात्र अनेक ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गांची मोठी लोकसंख्या एखाद्या विशिष्ट वॉर्डमध्ये असतानाही आरक्षण दुसऱ्या वॉर्डला दिले जाते. त्यामुळे संबंधित समाजाचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जात नसून आरक्षणाचा मूळ उद्देशही साध्य होत नसल्याचा दावा पक्षाने केला आहे.

बहुजन मुक्ती पार्टीने प्रशासनाकडे मागणी केली की, ज्या वॉर्डमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागास प्रवर्गांची लोकसंख्या सर्वाधिक आहे, त्या वॉर्डांना आरक्षणात प्राधान्य देण्यात यावे. तसेच आरक्षण निश्चितीपूर्वी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेची वॉर्डनिहाय लोकसंख्या सार्वजनिक करण्यात यावी आणि "प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व" हे आरक्षण निश्चितीचे प्रमुख मार्गदर्शक तत्त्व स्वीकारण्यात यावे. या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन बहुजन मुक्ती पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रतापदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. यावेळी विधानसभा प्रभारी भुवन मुनेश्वर, शहराध्यक्ष गजानन गोडवे, नरेंद्र खरतडे, संतोष भगत, उल्हास बहादे, विपूल चव्हाण, सतीश कांबळे, रूपेश देवतळे, अशोक मेश्राम, रामपाल मडावी, सारिपुत्रा भगत, आकाश नेवरे, धम्मानंद स्थूल, धर्मेंद्र स्थूल, नितीन कुमरे, रविंद्र कांबळे, साहेबराव पुनवटकर, रवी मनवर, उत्तम लढे आणि दिलीप वंजारी यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. २६ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## विद्यापीठात छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी



**अमरावती :** छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावी-आयुक्त वर्षा लड्ढा

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती:** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांनी गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेतली. या बैठकीत विविध विभागांनी केलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी पुढाकार घेऊन समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

बैठकीत अतिवृष्टी, पूरस्थिती, सखल भागांमध्ये पाणी साचणे, नाल्यांना आलेला पूर, झाडे पडणे, वीजपुरवठा खंडित होणे, रस्त्यांवरील वाहतुकीच्या समस्या तसेच इतर संभाव्य नैसर्गिक संकटांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण हे प्रशासनाचे सर्वोच्च कर्तव्य असून त्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने आणि सजगतेने काम करण्याची आवश्यकता असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

आयुक्त वर्षा लड्ढा यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन हे केवळ आपत्ती व्यवस्थापन विभागाचे काम नसून प्रत्येक विभागाची त्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे सर्व विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रातील संभाव्य धोक्यांचे मूल्यांकन करून आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहावे. विभागांमधील समन्वय आणि माहितीची देवाणघेवाण प्रभावी असेल तर कोणत्याही संकटाचा सामना अधिक सक्षमपणे करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शहरातील नाले, गटारे आणि जलनिस्सारण व्यवस्थेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. पाणी तुंबण्याच्या समस्येवर नियंत्रण मिळविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सखल भाग, पूरप्रवण क्षेत्रे आणि संवेदनशील परिसरांची नियमित पाहणी करण्यास सांगण्यात आले.

बैठकीत आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या कार्यपद्धतीवरही चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास



कार्यरत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आपत्तीच्या प्रसंगी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री, वाहने, पंपिंग मशीन, जनरेटर आणि इतर साहित्य तत्परतेने उपलब्ध राहील याची खात्री करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

उद्यान विभागाला धोकादायक व सुकलेल्या झाडांची छाटणी करण्याच्या, बांधकाम विभागाला जीर्ण व धोकादायक इमारतींची तपासणी करण्याच्या, आरोग्य विभागाला साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या, तर स्वच्छता विभागाला शहर स्वच्छता आणि जलनिस्सारण व्यवस्था सुरळीत ठेवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. अग्निशमन विभागाने बचाव आणि मदत कार्यासाठी आवश्यक तयारी पूर्ण ठेवावी, असेही निर्देश बैठकीत देण्यात आले.

यावेळी आयुक्त वर्षा लड्ढा यांनी स्पष्टपणे नमूद केले की, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी केवळ अमरावती महानगरपालिकेची नसून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण कंपनी, पोलीस प्रशासन तसेच इतर संबंधित शासकीय विभागांचीही तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. सध्या अनेक ठिकाणी महानगरपालिकाच पुढाकार घेऊन आपत्ती व्यवस्थापनाची कामे करताना दिसत असली तरी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने कार्य करणे आवश्यक आहे. आपत्तीच्या काळात कोणत्याही एका यंत्रणेवर अवलंबून न राहता प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील जबाबदाऱ्या तत्परतेने पार पाडाव्यात, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध ठेवावी आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद द्यावा, अशा सक्त सूचना आयुक्तांनी संबंधित विभागांना दिल्या. आयुक्त वर्षा लड्ढा यांनी सर्व विभागप्रमुखांना आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह क्षेत्रीय स्तरावर नियमित पाहणी करण्याचे निर्देश दिले. कोणतीही समस्या उद्भवण्यापूर्वीच तिचे निराकरण करण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी केले. आपत्तीच्या काळात नागरिकांना त्वरित मदत मिळणे, नुकसान कमी करणे आणि जनजीवन सुरळीत ठेवणे ही सर्व विभागांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बैठकीच्या शेवटी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित प्रत्येक कामात पुढाकार घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, असे निर्देश आयुक्तांनी दिले. पावसाळ्याच्या काळात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासन तत्परतेने प्रतिसाद देईल आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, पोलीस विभाग वाहतुक शाखा निलेश गावंडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक संचालक नगर रचना सागर वानखडे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, सब डिव्हीजनल इंजि. तुषार काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिव्हील इंजि. सुनिल जाधव, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाचे सहा.अधिक्षक अभियंता तन्वी साळुंके, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त मंगेश कडु, मुख्य अग्निशमन अधिकारी दिनेश हंबर्डे, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा सांख्यिकी अधिकारी अक्षय निलंगे, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, एस.ई. रविंद्र तांबेकर, श्रीरंग तायडे, उपअभियंता शरद तिनखेडे, आशिष अवसरे, विवेक देशमुख, हेमंत महाजन, अभियंता लक्ष्मण पावडे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी, उपअभियंता, अभियंता तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## पोलीस स्टेशन खोलापुर येथील गुटखा कार्यवाही

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती :** पोलीस स्टेशन कोल्हापूरच्या वतीने गुटखा पकडण्यात आला. पोलीस अधिक्षकनिकेतन कदम यांनी पोस्टे हददीत वरली जुगार अवैदय दारु विक्री गावठी हतभाटटी व अवैध रेती वाहतुक, गोवंश वाहतुक, गुटखा विक्री व वाहतुक यांचे विरुध्द कठोर कार्यवाही करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले.

त्या नुसार दि. २२/०६/२३ रोजी गुप्त बादमीदाराकडून मिळोल्या माहीती वरुन शासन प्रतीबंधीत गुटखा धामोरी मध्ये राहणारा शाम मोहन मिश्रा वय ३९ वर्ष रा. धामोरी ता. भातकुली जि. अमरावती याचे घरी आहे वरुन त्याचे झडती मध्ये खालील प्रमाणे



गुटखा मिळुन आला.

असा एकुन ४५४० रु चा माल मिळाला आहे वरुन पोस्टे खोलापुर येथे अप क्र ११०/२६ कलम अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ तसेच BNS चे कलम २२३, २७४, २७५ व कलम १२३ चे कलम नुसार दाखल करण्यात आलेला आहे

सदरची कारवाईपोलीस अधिक्षक निकेतन कदम सा यांचे आदेशान्वये मा. अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड सा, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी सा यांच्या मार्गदर्शनात खोलापूर पोलीस स्टेशनचे API अनुप वाकडे, ग्रेड पोउपनी चंद्रशेखर गावंडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल/ शैलेश घुरडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल/२३३२ दीपक उईके, पोलीस कॉन्स्टेबल/६२७ निखिल आमझरे यांनी केलेली आहे.

## अखेर गोविंद पिंजरकर यांची झुंज अपयशी

♦ २४ जून रोजी मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुक्कराने केला प्राणघातक हल्ला ♦ शहरात डुक्करांचा बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती:** शहरातील शेगाव रोडवरील आशियाड कॉलनी परिसरात दिनांक २४ जून रोजी पहाटे मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुकराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गोविंद पिंजरकर (वय ७५) या ज्येष्ठ नागरिकाची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली आहे. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी सकाळी ६ वाजता अखेरचा श्वास घेतला. या दुर्दैवी मृत्यूनंतर आज दोन दिवसांनीही आशियाड कॉलनी व परिसरात प्रचंड शोककळा आणि भीतीचे वातावरण असून, प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.



**काय घडली होती घटना?**

गत बुधवारी (२४ जून) पहाटे सव्वा पाचच्या सुमारास आशियाड कॉलनीचे रहिवासी गोविंद पिंजरकर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. कॉलनीतील विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेतून अचानक आलेल्या एका पिसाळलेल्या रानडुकराने त्यांच्यावर अत्यंत भीषण हल्ला चढवला. हा हल्ला इतका भयंकर होता की, डुकराने पिंजरकर यांच्या संपूर्ण अंगावर ठिकठिकाणी गंभीर चावे घेतले, ज्यामध्ये त्यांना आपले एक बोटही गमवावे लागले होते. प्रत्यक्ष दर्शी असलेले ज्येष्ठांनीसुद्धा या घटनेची धास्ती घेतली आहे. या घटनेची थरारक दृश्ये परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, हा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण अमरावती शहर हादरले आहे.

**आक्रमक झालेल्या नागरिकांच्या मागण्या**

पिंजरकर यांच्या मृत्यूनंतर आशियाड कॉलनीतील नागरिक अत्यंत आक्रमक झाले असून विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील ज्या मोकळ्या जागेतून वन्य प्राण्यांचा व डुकरांचा शहरात वावर होतो, तिथे त्वरित मजबूत कंपाउंड वॉल किंवा नाल्यावर पूर्णपणे बंदिस्त आरसीसी गटर लाईनचे बांधकाम तातडीने सुरू करण्याची मागणी केली.

**बिबट्यानंतर आता रानडुकरांचे सावट**

गेल्या वर्षी शहरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात बिबट्याने शिरकाव केला होता आणि त्यानंतर याच आशियाड कॉलनीतही त्याचा वावर आढळला होता. बिबट्याच्या त्या दहशतीची आठवण ताजी असतानाच, आता नाल्यालगत राहणाऱ्या रानडुकरांनी नागरिकांचा जीव घ्यायला सुरुवात केली आहे. या डुकरांच्या शिकारीसाठी भविष्यात पुन्हा बिबट्या या निवासी भागात येण्याची दाट शक्यता असल्याने रहिवासी रात्री-अपरात्री घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत.

**ज्येष्ठांची काळजी घ्या**

महानगर पालिकेकडून फारशा अपेक्षा करणे चुकीचे आहे. जी यंत्रणा नालीसफाई नीट करू शकत नाही त्यांचेकडून स्वच्छता व इतर सुरक्षा विषयक अपेक्षा करणे व्यर्थ आहे. माझे वडील गेले पण इतरांचे जाऊ नये यासाठी एकटे न फिरता सुरक्षेची काळजी घेऊन स्वतःला जपण्याचं आवाहन प्रवीण गोविंद पिंजरकर यांनी केले.

## ज्वेलर्स च्या दुकानात दरोडा टाकण्याचा प्लॅन फसला

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती :** दुकानात शिरून सराफा व्यावसाईकाला केली मारहाण करण्यात आली. चांदी आभूषण पिशवी घेऊन जातांना नागरिकांनी धाव घेतली. पळून गेलेल्या आरोपी ला घरातून पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. लूटमारीची सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे.

अमरावती शहरातील फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील राहुल नगर येथील माँ वैष्णवी ज्वेलर्स येथे २४ जून रोजी सायंकाळी दरोड्याची गंभीर घटना घडली.

ज्वेलर्स मालक फिर्यादी विलास काळे राहणार महावीर नगर, अमरावती) हे त्यांच्या ज्वेलर्स दुकानात असताना आरोपी भोलासिंग आझादसिंग टाक (वय



३० वर्षे, रा. परिहारपुरा, अमरावती) हा अचानक दुकानात घुसला. आरोपीने काऊंटरवरील काच फेकून मारून फिर्यादीस दुखापत केली तसेच हातातील कड्याने डोक्यावर वार करून जखमी केले. त्यानंतर फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देत दुकानातील अंदाजे १ किलो चांदी, ४० ग्रॅम सोने व काऊंटरमधील सुमारे ४० हजार रुपये रोख रक्कम घेण्याचा प्रयत्न केला.

घटनेनंतर फिर्यादीने आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिकांनी आरोपीचा पाठलाग करून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपीकडील दागिन्यांची पिशवी नागरिकांनी हिसकावून घेतली . मात्र आरोपी मोटारसायकलवरून घटनास्थळावरून पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटना स्थळी धाव घेतली.. सीसी टीव्ही फुटेज तपासून लगेच वडाळी येथून आरोपी ला घरातून तात्काळ ताब्यात घेतले

घडलेला सर्व प्रकार दुकानातील सीसी टीव्ही कॅमेरात कैद झाला ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, यांच्या आदेशाने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार, यांच्या मार्गदर्शनात PSI राहुल महाजन, इएघ् अर्जुन राजारपल्लू, पोलीस हवालदार सुभाष पाटील व रज्जाक शेखुवाले दोन्हीही तपास पथकाच्या डिबी पोलिसांनी केली.

## नागपुरीगेट हद्दीतून ५४.२ ग्रॅम मॅफेड्रान ड्रग्ससह आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती:** नागपूरीगेट हद्दीतून ५४.२ ग्रॅम मॅफेड्रान ड्रग्स (एम.डी.) किंमत ८ लाख १५ हजारांचे मुद्देमालासह आरोपीस ताब्यात घेतले आहे.

गुन्हे शाखा युनिट क्रमांक ०१, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारा कडून गोपनिय माहिती प्राप्त झाली की, रेकॉर्ड वरील एक गुन्हेगार हबीब नगर, नं. ०१, अमरावती येथे त्याचे राहते घरात मेफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ बाळगून विक्री करीत आहे. अशा गोपनिय व खात्रीशीर माहितीवरुन दिनांक २६/०६/२०२६ रोजी गुन्हेशाखा, अमरावती शहरचे अधिकारी व अंमलदार यांनी पो.स्टे. नागपूरीगेट हद्दीत हबीब नगर, नं.



१, अमरावती येथे अब्दुल इजाज उर्फ इनान चन्द्रपूर यांचे राहते घरी छापेमारी केली असता घरझडतीमध्ये ५४.२ ग्रॅम मेफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ मिळून आला. सदर अंमलीपदार्थ हा विक्रीकरीता बाळगत असल्याची कबुली दिली.आरोपी विरुध्द पो.स्टे. नागपूरीगेट येथे गुन्हा नोंद करणे सुरु आहे.

अब्दुल इजान अब्दुल अजीम उर्फ इजाज चन्द्रपूरी, वय ५५ वर्षे, रा. हबीब नगर, नं. ०१, अमरावती असे आरोपीचे नाव असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल -

५४.२ ग्रॅम मेफेड्रान ड्रग्स (एम.डी.) किं. ८,१३,०००/-रु. ईलेक्ट्रानिक्स वनज काटा किं. २,०००/-रु. असा एकूण ८,१५,०००/-रु. चा मुद्देमाल आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके सा. (परिमंडळ- १, रमेश धुमाळ, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) श्र शिवाजी बचाटे, तसेच सहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) कैलाश फुंडकर यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर, सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सपोनि महेश इंगोले, पो. उपनि. गजानन सोनुने, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहवा सतिष देशमुख, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे.कॉ. नाझीमउददीन सैयद, पो.ना. सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, सागर ठाकरे, नरेश मोहरिल, म.पो. शी. वर्षा घोंगडे, चालक चेतन शर्मा, पो.हे. कॉ. सुधिर गुढधे गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.

# कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज- आ. संजय खोडके

♦ प्रशासकीय व्यवस्थेकडून आकडेवारी लपविले जात असल्याने बालमृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना करतांना अडचणी निर्माण

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती :** आज पर्यंत शासनाच्या वतीने मातामृत्यू -बालमृत्यू रोखण्यासह कुपोषण मुक्तीसाठी कोट्यवधींचा निधी खर्च केला असला तरीही या बाबतची गंभीर परिस्थिती जैसे थे आहे. या संदर्भात न्यायालयाने दखल घेतली असतांना मात्र शासन या गंभीर प्रश्नाबाबत संवेदनशील नसल्याचा समज आज कुपोषणग्रस्त भागात काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यामध्ये निर्माण झाला आहे. कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी तात्पुरत्या सुधारणा करून चालणार नाही तर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याने आज प्रशासकीय व्यवस्थेने दिलेल्या आकडेवारीवर विश्वास व्यक्त न करता मेळघाट सारख्या कुपोषित भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या माहितीच्या आधारे , व उच्च न्यायालयाचे दिशानिर्देश सोबतच सार्वजनिक आरोग्य विभाग व महिला बाल विकास विभागाने समन्वय राखून पुढे जाण्याची गरज असल्याची लक्षवेधी सुचना विधान परिषद आमदार - संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळासमक्ष केली.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार संजय खोडके यांनी कुपोषणबाधित जिल्ह्यांमध्ये वाढते माता मृत्य व बाल मृत्यूचे प्रमाण एक गंभीर समस्या असल्याचे सांगून या संवेदनशील विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी याबाबतची आकडेवारी मांडतांना सांगितले कि, सद्यास्थितीत राज्यभरात वर्ष २०२५-२६ या वर्षात १२ हजार बालमृत्यू झालेत, त्यापूर्वी वर्ष २०२१-२०२२ मध्ये १६हजार बालमृत्यू झाले ,वर्ष २०२३-२०२४ मध्ये १३ हजार बालमृत्यू , तर वर्ष २४-२५ मध्ये १३ हजार बालमृत्यू होते. याबाबतचे आकडे हे प्रशासकीय यंत्रणेने दिले नसून ते माहितीच्या अधिकारातून समोर आले असल्याची धक्कादायक बाब सुद्धा आ.संजय




खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. प्रशासकीय यंत्रणेकडून आकडे लपविले जात असल्याने बाल मृत्यू रोखणे संदर्भात उपाययोजना करतांना अडचणी निर्माण होत आहे. आदिवासी भागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना सुद्धा आकडेवारी दिली जात नाही. त्यांना माहिती दिल्यास कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासंदर्भातील त्रुटी , सुधारणा व उपाययोजना बाबत संस्था काही सूचना करून शकतात. त्यामुळे आता नवसंजीवनी प्रोजेक्टचे कार्यकर्ते आता हायकोर्टात पोहोचल्याने बालमृत्यूच्या वाढत्या परिस्थितीसंदर्भात न्यायालयातूनच दिशा-निर्देश आल्याने शासन व्यवस्था या संदर्भात असंवेदनशील असल्याच्या भावना निर्माण होत असल्याचे सुद्धा आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष स्पष्ट केली.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट -धारणी भागात बालमृत्यू आणि मातामृत्यू कुपोषणामुळे होत आहेत. कुपोषण हा महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येणारा विषय आहे. तसेच बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी पेडियाट्रिक्स डॉक्टर सह अँम्ब्युलन्स सुविधा सुद्धा उपलब्ध करणे आवश्यक आहे. शासन पोषण आहारामध्ये निधी वाढवून प्रति लाभार्थी ४५ रुपये करणार होते, तर स्पर्श योजनेतून अँम्बुलंस वाहक चालकांना डिझेलचे पैसे अजूनही नियमित नसल्याने नसल्याने पेट्रोल पंपचालकांनी अँम्ब्युलन्सला १५-१५ दिवस डिझेल देणे बंद केले आहे. आरोग्य विभागात मनुष्यबळाचा अभाव असून सीडीपीओ ची पदे सुद्धा कमी आहेत. अशी वस्तूस्थिती सुद्धा आ.संजय खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे या गंभीर प्रश्नाकडे मोठ्या संवेदनशीलतेने बघण्याची गरज असून शासनाच्या महिला व बाल विकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्या समन्वयाने काम करण्याबरोबरच स्थानिक भागात काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांना सोबत घेऊन , बैठक लावून काम काम करण्याची गरज असल्याची लक्षवेधी सूचना आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष केली. माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मेळघाट -धारणी मध्ये ३०० बेडेड हॉस्पिटल निर्माण करण्यात आलेल आहे, राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग हे काम जलद गतीने पूर्ण करणार आहे. अशी आशा सुद्धा यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावर विधान परिषदेमध्ये उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री- ना. प्रकाश आबिटकर म्हणाले कि, देशातील इतरही राज्यांमध्ये बालमृत्यू उपाययोजना संदर्भात जो काही देशपातळीवर डाटा उपलब्ध आहे. त्या आधारे शासन उपाययोजना करत आहे. मात्र त्याही पुढे जाऊन चांगले काम करण्याची भूमिका सदस्यांनी मांडली असून ती अतिशय रास्त असल्याचे मंत्रीमहोदय म्हणाले. देशात बालमृत्यू कमीकरण्यासाठी उपाययोजना करण्यात जे काही राज्य सक्रिय आहेत, त्यात महाराष्ट्र राज्य अव्वल आहे. देशात नवजात मृत्यूचे प्रमाण १८ असतांना महाराष्ट्र १० इतके नवजात मृत्यूचे प्रमाणे प्रमाण आहे. तर अर्भक मृत्यूमध्ये देशाचे प्रमाण २४ तर महाराष्ट्राचे प्रमाण १३ आहे. बालमृत्यूमध्ये देशाचा आकडा २८ तर महाराष्ट्राचा १५ आहे. देशाच्या आकडेवारीत महाराष्ट्र ठीक असला तरी यापुढे जाऊन प्रगत महाराष्ट्रासाठी अजून झेप घ्यावी लागणार असल्याचे मंत्रीमहोदय म्हणाले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि २६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## मिनी ट्रॅक्टरसाठी शासनाकडून ९० टक्के सूट...

# भ्रष्टअधिकाऱ्याची दुहेरी लूट !

### समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान

•सिटी न्युज ब्युरो @वाशीम•

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने मिनी ट्रॅक्टर देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.परंतु येथील 'कथित' अधिकाऱ्याने त्याच्या दलालीच्या रक्कमेच्या हव्यासापोटी संगनमतात सहभागी असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या विक्रेत्याने मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून लालची अधिकाऱ्याला लाखो रूपयाचा मलिदा वाटल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. समाज कल्याण अधिकारी पैशासाठी लाचार असुन मिनी ट्रॅक्टर खरेदीत भ्रष्टाचार झाल्याची चर्चा आहे. टॅक्टर एजन्सी वाल्यांकडून २५ ते ३० हजार रूपये कमीशन घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तर दुसरीकडे प्रत्येक बचत गटाकडून १० ते १५ हजार रूपये मंजुरीकरीता घेतल्याची चर्चाही होत आहे.

समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते. त्या योजना प्रभावीपणे राबवून बचत गटातील सर्व महिलांना फायदा व्हावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे.परंतु वाशीम येथील कार्यरत लालची अधिकाऱ्याने स्व-कल्याणासाठी




वाशीम व परिसरातील विविध कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रेत्यांना डावलून चक्क २५० किलोमीटर दूर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील 'मॅसे फर्ग्यूसन' कंपनीच्या विक्रेत्यासोबत संगनमत करून मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ट्रॅक्टर विक्रेत्याने एका मिनी ट्रॅक्टरची किंमत ३ लाख ८० हजार लावून लालची अधिकाऱ्याला एका ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपयाप्रमाणे लाखो रूपयाचे 'गिफ्ट' म्हणून दिल्याची समाजकल्याण विभागात चर्चा आहे.

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पात्र असलेल्या महिला बचत गटाने त्यांच्या हिस्याची १० टक्के रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केल्याचे समजते.तसेच समाज कल्याण विभागाने सर्व महिला बचत गटाच्या खात्यामध्ये ९० टक्के रक्कमेतील ५० टक्के रक्कम जमा केल्याचे वृत्त आहे. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मिनी ट्रॅक्टर बचत गटाला मिळाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यात जमा होणार असल्याचे समजते. मिनी ट्रॅक्टर घेणाऱ्या महिला बचत गटाला छत्रपती संभाजीनगरला सेवा व दुरूस्तीसाठी ये-जा करणे सोयीचे नसेंल्याने अमरावती विभागीच्या समाज कल्याण आयुक्तांनी 'हा' मिनी ट्रॅक्टर खरेदीचा लालची अधिकाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेला व्यवहार त्वरीत रद्द करून वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटांना न्याय द्यावा,दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी .अशी विविध स्तरातून मागणी होत आहे.

## थोडक्यात

### साखरडोह येथे योगदीन



•सिटी न्युज ब्युरो @मंगरूळपीर•

ग्रा.पं. व जिल्हा परिषद केंद्रीय शाळा साखरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ठीक ७ वाजता जागतिक योग दिनानिमित्त योग प्राणायाम कार्यक्रम संपन्न झाला.

योग शिक्षक तथा ग्रामपंचायत अधिकारी सुरेश गावंडे पाटिल यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक विजय पवार सर,ठाकरे सर, गवई मॅडम,साबळे मॅडम यांच्या सह अंगणवाडी सेविका केंद्र १व २ शारदा इंगोले, बेबी भोयर आशा कांताबाई देवराव इंगोले उपस्थित होत्या. सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन प्रभारी केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक विजय पवार सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्या करता ग्रामपंचायतचे शिपाई उमेश रामभाऊ चव्हाण यांनी अथक परिश्रम घेतले . ३० जून ला शाळा सुरू झाल्यानंतर दर शनिवारी सकाळी ७ ते ८ या वेळात विद्यार्थ्यांना योग प्राणायाम शिकविण्याचे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी सुरेश पाटील गावंडे यांनी दिले.

### व्यसनमुक्ती नाट्यरूपाने जनजागृती कार्यक्रम



•सिटी न्युज ब्युरो @मंगरूळपीर•

मानोरा नाट्य, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगन्य असणाऱ्या नटश्री बहू. संस्था व स्त्रिशक्ती बहू. संस्था मानोरा, संलग्न अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई चे वतीने मानोरा येथील बस स्थान जवळ बुधवार दि २४ जून रोजी दुपारी ४ ते ५.३० या दरम्यान नाट्यरूपाने व गीत गायनाने व्यसनमुक्ती पर कार्यक्रम साजरा करण्यात आला. अनेक उदाहरणे देऊन जनजागृती चे माध्यमातून लोकांना दिले.

या कार्यक्रमात कलावंत म्हणून यशवंत पद्मगीरवार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता. नालवादक उत्तम कांबळे, हार्मोनियम वादक वामनराव चतुर, किरण पद्मगीरवार, कावेरी पेंढारकर ई. नि कार्यक्रम यशस्वीरित्या सादर केला. व या सादरीकरनास प्रेक्षकानी भरभरून दाद दिली.

## केनवडात नागरिकांच्या जीवाशी खेळ...
## दवाखान्यासमोरच जैविक कचरा जाळण्याचा मेळ!

### आजही प्रकार चालुचं वर्षभरानंतरही कारवाई नाही

•प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड•

रिसोड तालुक्यातील केनवड येथे एका खासगी दवाखान्यांकडून घातक जैविक कचरा दवाखान्यासमोरच जाळून त्याची विल्हेवाट लावली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, सिरिंज, काचेच्या औषधांच्या शिश्या व इतर वैद्यकीय कचरा उघड्यावर जाळला जात आहे. कागद व प्लास्टिक जळून जात असले तरी सुया आणि काचेच्या शिश्या जागेवरच पडून राहत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

हा प्रकार राष्ट्रीय महामार्गालगत, अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोर आणि मुख्य रस्त्याच्या कडेला सुरू आहे.








परिसरात जिल्हा मध्यवर्ती बँक, एसबीआय, सेतू केंद्र, ग्रामीण उपकेंद्र, एसटी बसथांबा तसेच गुरुवारी मोठी बाजारपेठ भरत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. लहान मुले, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व रुग्ण यांची या परिसरात सतत ये-जा असते.विशेष म्हणजे सिटी न्यूज सुपरफास्टने ५ ऑगस्ट २०२५ रोजी 'केनवडात नागरिकांच्या जीवाशी खेळ; आरोग्याशी खेळ' या मथळ्याखाली ही बाब उघड केली होती. मात्र एक वर्ष उलटूनही संबंधित विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. आजही त्या ठिकाणी काचेच्या शिश्या आणि इंजेक्शनच्या सुया पडलेल्या दिसत आहेत.जैविक कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावणे बंधनकारक असतानाही नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. संबंधित दवाखान्याची चौकशी करून जबाबदारांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.




### आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार?

केनवड येथे खासगी दवाखान्यातील घातक जैविक कचरा उघड्यावर जाळला जात असल्याचा प्रकार सिटी न्यूज सुपरफास्टने वर्षभरापूर्वीच उघडकीस आणला होता. मात्र त्यानंतरही संबंधित विभागाकडून प्रभावी कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. आजही त्याच ठिकाणी इंजेक्शनच्या सुया, काचेच्या औषधांच्या शिश्या आणि इतर वैद्यकीय कचरा पडून असल्याचे दिसत आहे.जैविक वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावणे बंधनकारक असतानाही नियमांचे पालन होत आहे का, याची नियमित तपासणी होत नसल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. राष्ट्रीय महामार्गालगत, बँका, सेतू केंद्र, ग्रामीण उपकेंद्र, एसटी बसथांबा आणि साप्ताहिक बाजाराच्या परिसरात असा प्रकार सुरू राहणे ही गंभीर बाब मानली जात आहे. यामुळे संबंधित आरोग्य विभागाच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित होत असून, जबाबदारांवर कारवाई करून भविष्यात अशी पुनरावृत्ती होणार नाही यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## ग्रामपंचायत च्या भ्रष्टाचाराच्या चौकशीस विलंब...
## आता होणार कारवाईचा अवलंब !

### गटविकास अधिकाऱ्यांवर आश्रय देत असल्याचा आरोप

•सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार•

मंगरूळपीर तालुक्यातील शेलूबाजार येथील ग्रामपंचायतच्या चौकशीच्या तक्रारदाराने एक वर्ष झाले तक्रार करून सुद्धा प्रकरणाची चौकशी गेल्या एक वर्षापासून प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित प्रकरणात पंचायत समिती स्तरावर चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी अद्याप अंतिम निर्णय किंवा अहवाल समोर आलेला नाही.

तक्रारदारांचे म्हणणे आहे की, सचिवांना व माहिती गठीत झाली आहे त्यांना सचिवाचा सहकार्य होत नाही असे उत्तर दिले जाते गटविकास अधिकारी पण त्यांना श्रेय देण्याचे काम दिसून येत आहे त्यांना विचारपूस केले असता उडवा उडवी चे उत्तर देतात गटविकास अधिकारी यांच्याकडून चौकशी प्रक्रियेला अनावश्यक विलंब केला जात असून संबंधितांना आश्रय दिला जात असल्याची शंका निर्माण झाली आहे. चौकशी लवकर पूर्ण करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, प्रशासनाकडून चौकशी नियमानुसार सुरू असल्याचे सांगितले जात असून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे सूत्रांनी सांगितले. या प्रकरणाकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले असून चौकशी अहवाल कधी सादर होणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



## अनुसूचित जातीच्या वर्गीकरणासाठी करा चर्चा,
## मातंग समाजाचा आक्रोश मोर्चा !

•सिटी न्युज ब्युरो @वाशीम•

अनुसूचित जातींना न्याय हक्क मिळावेत तसेच समाजावर होणारा अन्याय थांबविण्यासाठी अनुसूचित जातीच्या आरक्षणातील अ ब क ड उपवर्गीकरण तत्काळ लागू करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी वाशिम येथे मातंग समाज बांधवांच्या वतीने भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.वाशिम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांना वंदन केल्यानंतर मोर्चाला सुरुवात करण्यात आली.

स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चाला माजी आ. नामदेवराव ससाने, लहुजी शक्ती सेना प्रदेशाध्यक्ष




कैलास खंडारे, राष्ट्रीय लहू शक्तीचे परिमल कांबळे, पद्मश्री ना.च. कांबळे, नागपुर येथील संजय कठाळे, विनोद जोगदंड, रवीकुमार कांबळे, संजय वैरागडे यांनी संबोधित केले. प्रास्ताविक क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाची कैलास डाखोरे यांनी केले. या मोर्चामध्ये आनंद सुतार, विश्रांतीताई खडसे, सोनालीताई जोगदंड, राम बाजड, शंकर पाटील खंडारे, चंद्रकांत साठे, कैलास रणशिंगे, यशवंतराव हिवराळे, आकाश कुचेकर, दीपक पाठे, नितीन पौळकर, शंकरराव दाभाडे, डॉ. रमेशचंदनशिव, दीपक भालेराव, आर. के. पाटोळे, सुनील दळवे, मोहनराज दुतोंडे, अनिल कांबळे, बाळासाहेब जोगदंड, मातंग समाजासह अनेक वंचित घटक आजही शिक्षण, नोकरी व प्रशासकीय क्षेत्रात अपेक्षित प्रतिनिधित्वापासून दूर आहेत. आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समानपणे पोहोचावा यासाठी उपवर्गीकरण हा प्रभावी मार्ग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सदर निवेदन राज्य शासनापर्यंत तातडीने पोहोचवावे आणि सरकारने लवकरात लवकर यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. विजय लोंढे, नारायण डाखोरे, गजानन पाटोळे, ॲड. जगदीश मानवतकर ॲड. आर. यू. हनवते, आकाश कांबळे, दत्ता गायकवाड, संतोष पांढरे, मनोज खडसे, आत्माराम सुतार, अभिषेक सुतार, संतोष आवारे, वासुदेव गायकवाड, संतोष लोखंडे यांच्यासह जिल्ह्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांना शिष्टमंडळाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी अन्यथा भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. उपस्थितांनी समाजाच्या न्याय हक्कांसाठी एकजुटीचा निर्धार केला.

## झेंडा सावरायला गेला, पण नियतीनेच खेळ केला !

### आई-लेकास विजेचा धक्का; एकुलत्या एक मुलाचा दुर्दैवी मृत्यू, केनवड गावावर शोककळा

•सिटी न्युज ब्युरो @केनवड•

रिसोड तालुक्यातील केनवड येथे २३ जून रोजी सायंकाळी घडलेल्या एका हृदयद्रावक दुर्घटनेने संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले. घरावरील झेंडा सरळ करत असताना लोखंडी पाईपचा ११ केव्ही उच्चदाब वीजवाहिनीशी संपर्क आल्याने संकेत संतोष खराटे (वय २०) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. मुलाला वाचविण्यासाठी जीवाची पर्वा न करता धाव घेतलेल्या त्याच्या आई सुलोचना संतोष खराटे यांनाही विजेचा तीव्र धक्का बसून गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी पावसाचे वातावरण असल्याने घराच्या छतावर वाळत घातलेल्या डाळी सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी आई व मुलगा छतावर गेले होते. त्यावेळी घरावरील झेंडा वाकलेला दिसल्याने संकेतने तो सरळ करण्याचा प्रयत्न केला. मात्र झेंड्याला लावलेला लोखंडी पाईप घरालगत गेलेल्या ११ केव्ही वीजवाहिनीला स्पर्श होताच क्षणार्धात विजेचा जोरदार धक्का बसला आणि आनंदाने बहरलेले घर एका क्षणात शोकमग्न झाले.मुलगा विजेच्या तडाख्यात सापडल्याचे पाहताच आई सुलोचना खराटे त्याला वाचविण्यासाठी धावल्या. मात्र नियतीने त्यांनाही सोडले नाही. त्यांनाही विजेचा धक्का बसून त्या गंभीर जखमी झाल्या. ग्रामस्थांनी तत्काळ दोघांनाही वाशिम येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी संकेतला मृत घोषित केले, तर आईवर उपचार सुरू आहेत.संकेत हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. कुटुंबाचा



आधारवड असलेला तरुण अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने खराटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील सर्वांच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या या कुटुंबावर ओढवलेल्या संकटामुळे केनवडसह संपूर्ण परिसर हळहळला आहे. २४ जून रोजी अत्यंत शोकाकुल वातावरणात संकेतवर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीपर्यंत परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे 'निसर्गही या दुःखात अश्रू ढाळत होता,' अशी भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केली. दिवंगत संकेतला श्रद्धांजली म्हणून गावातील काही हॉटेल्स व व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली.या दुर्घटनेनंतर गावातील घरांच्या अगदी जवळून जाणाऱ्या उच्चदाब वीजवाहिन्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी उघड्या उच्चदाब वीजवाहिन्यांच्या ऐवजी सुरक्षित भूमिगत केबल टाकण्यात यावी, तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी महावितरण विभागाकडे केली आहे.

**उघड्या ११ केव्ही वीजवाहिन्यांऐवजी भूमिगत केबल टाका...**

केनवड गावातून जाणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब वीजवाहिन्या अनेक घरांच्या अगदी जवळून गेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला कायम धोका निर्माण झाला आहे. संकेत खराटे यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर ग्रामस्थांनी महावितरणकडे तातडीने उघड्या वीजवाहिन्यांच्या ऐवजी सुरक्षित भूमिगत (अंडरग्राउंड) केबल टाकण्याची मागणी केली आहे. भविष्यात अशा हृदयद्रावक दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## पावसातही कर्तव्याला प्राधान्य;
## लाईनमन आढाव तत्परतेमुळे ग्रामस्थ धन्य !

•सिटी न्युज ब्युरो @केनवड•

काल दिवसभर सतत सुरू असलेल्या पावसातही कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य देत लाईनमन आढाव यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे पिंप्री (सरहद्द) गावाचा वीजपुरवठा अल्पावधीत सुरळीत करण्यात यश आले. त्यांच्या या कार्यात गावातील युवकांनीही मोलाची साथ देत सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले.तर तुटलेली तार पावसातही जोडून पिंप्री सरहद्द चां विद्युत पुरवठा सुरळीत केला अन्यथा गाव रात्रभर अंधारात पडले असते लाईणमन आढाव व ग्रामस्थांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

काल सकाळपासून पिंप्री (सरहद्द) गावाचा विद्युत पुरवठा अचानक खंडित झाला होता. चौकशी केली असता कुकसा येथील बेलगाव पाणंद रस्त्यावरील गावाकडे येणारी विद्युत तार तुटल्याचे निदर्शनास आले. मुसळधार पाऊस सुरू असल्याने दुरुस्तीचे काम अत्यंत जोखमीचे होते.अशा प्रतिकूल परिस्थितीतही लाईनमन आढाव यांनी विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. तुटलेली तार जोडण्यासाठी काही काळ महामार्गावरील वाहतूक थांबवावी लागली. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी गावातील प्रसन्नजित देशमुख, सुनील गवळी, हरिभाऊ हजारे, कैलास भांदुर्गे, संतोष



नाईकवाडे आणि ईश्वर ठोकरे यांना मदतीचे आवाहन केले.आवाहन मिळताच या सर्वांनी पावसाची तमा न बाळगता घटनास्थळी धाव घेतली. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून तुटलेली विद्युत तार सुरक्षितपणे जोडण्यात आली. परिणामी पिंप्री (सरहद्द) गावाचा वीजपुरवठा पुन्हा सुरळीत झाला आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला.संकटाच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या सेवेसाठी झटणारे लाईनमन आढाव तसेच मदतीसाठी तत्काळ धावून आलेल्या गावातील युवकांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि सामाजिक बांधिलकीचे ग्रामस्थांकडून कौतुक होत असून, त्यांच्या या कार्याला सर्व स्तरांतून सलाम व्यक्त करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. २६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी महिलेचा मृत्यू: खामगाव-अकोला रोडवरील रात्रीची घटना

**खामगाव:** खामगाव-अकोला रोडवर रात्री झालेल्या भीषण अपघातात एका पादचारी महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. रस्त्याच्या कडेला चालत असताना भरधाव अज्ञात वाहनाने तिला जोरदार धडक दिल्याची प्राथमिक माहिती आहे. धडक इतकी जबरदस्त होती की महिला गंभीर जखमी झाली. अशा प्रकारच्या हिट अँड रन घटनांमध्ये अज्ञात वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करून पोलिस तपास सुरू केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे वाहनाचा माग काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी अपघातास कारणीभूत वाहनचालकावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# 24 तासात 30.2 मिमी पावसाची नोंद; काही ठिकाणी वीज पडून नुकसान!

प्रतिनिधी २६ जून

### ◆ खामगाव परिसरात दमदार पाऊस; खोळंबलेल्या पेरण्यांना आला वेग!

**खामगांव:** गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने खामगाव परिसरात जोरदार पुनरागमन केले आहे. गेल्या २४ तासांत परिसरात तब्बल ३०.०२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अनेक ठिकाणी सहा इंचांपेक्षा जास्त पाऊस झाल्याने कोरड्या पडलेल्या धरणांना आणि विहिरींना जीवदान मिळाले असून, शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. या पावसामुळे रखडलेल्या आणि खोळंबलेल्या पेरण्यांना आता चांगलाच वेग आला आहे.



जून महिन्यातील मृग नक्षत्र कोरडे गेल्यामुळ परिसरातील शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या होत्या. प्रारंभी झालेल्या पावसामुळे काही शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या. मात्र मान्सूनने पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. तर बहुतांश भागात शेतकऱ्यांच्या मशागतीचे काम पुर्ण होऊन पेरणीयोग्य पावसाची शेतकरी वाट पाहत होता. मात्र जून महिन्याचा अध्यपिक्षा जात काळ उलटूनही पाऊस न आल्याने शेतकऱ्यांचे आभाळाकडे लक्ष लागले होते.

**शेतकरी राजा सुखावला; पेरण्यांची लगबग सुरू**
मृग नक्षत्र कोरडे गेल्यामुळे शेतकरी चिंतेत होता आणि पावसाची चातकासारखी वाट पाहत होता. मात्र, गेल्या २४ तासांत झालेल्या या दमदार पावसामुळे चिंतेचे ढग बऱ्याच अंशी दूर झाले झात आहेत. जमिनीमध्ये पुरेशी ओल निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी तातडीने पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे. बियाणे आणि खते खरेदी करण्यासाठी बाजारातही गर्दी दिसून येत आहे.

दरम्यान २२ जून रोजी अखेर वरून राजाने खामगावसह घाटाखालील सर्वच तालुक्यात हजेरी लावली. आणि शेतकऱ्यांच्या पेरणीच्या आशा पल्लवित झाल्या मागील २२ आणि २३ जून या दोन दिवसात जवळपास ४७.७मिमी पाऊस झाला असून २३ जून रोजी २४ तासात ३०.०२ मिमी पावसची नोंद झाली आहे. त्यामुळे परिसरात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून परिसरात पेरणीची लगबग सुरू झाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे पाऊस सुखावणारा ठरला असतानाच, दुसरीकडे मात्र विजांच्या कडकडाटाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली.खामगाव शहरासह ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विजा पडून नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नसले तरी नुकसान झाले आहे.

## ओलावा झाल्यानंतरच पेरणी करा; कृषी विभागाचे आवाहन

प्रतिनिधी २६ जून

**बुलढाणा :** खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा झाल्याशिवाय सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कपाशी आदी पिकांची पेरणी करू नये.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, शेतातील जमिनीमध्ये किमान ६ इंच ओलावा अथवा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणी करणे आवश्यक आहे. पुरेसा ओलावा नसताना घाईघाईने पेरणी केल्यास जमिनीतील उष्णतेमुळे बियाण्यांचे अंकुरण कमी होण्याची किंवा अंकुर जळण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.

दरम्यान, जिल्ह्यात सध्या समाधानकारक पावसाची सुरुवात झाली असून, पावसाची स्थिती लक्षात घेऊनच पेरणीचे नियोजन करावे, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

## दुधलगाव बु. येथे दूषित पाणीपुरवठा; ग्रामस्थांचे पं.स गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**मलकापुर :** तालुक्यातील दुधलगाव बु. येथील दूषीत पाणीपुरवठा संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा ट्रस्टचे अध्यक्ष अजय प्रभाकर सावळे यांच्या नेतृत्वात गटविकास अधिकारी श्रीमती सजगाने यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेनेचे गणेश सुशीर उपस्थित होते.



याबाबत सविस्तर वृत्त असे की दुधगाव बु.येथे गेल्या कित्येक दिवसापासून दूषित पाणीपुरवठा संपूर्ण गावाला होत आहे. या संदर्भात स्थानिक ग्रामपंचायतीला वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा ग्रामपंचायत कार्यालयात कोणत्या प्रकारची या पाणी संदर्भात कारवाई होत नव्हती. त्यामुळे सकाळीच समस्त गावकरी हे ग्रामपंचायत कार्यालयात जमा होऊन त्यांनी या संदर्भात ग्रामसेवक आणि सरपंच यांना प्रश्नांचा भडिमार करून त्यांना निवेदन सादर केले आणि लवकरात लवकर या प्रकरणात कारवाई करा अन्यथा उग्र आंदोलन केल्या जाईल असा इशारा यावेळी गावकऱ्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिला.आणि यासंदर्भात मलकापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा ट्रस्टचे अध्यक्ष अजय प्रभाकर सावळे यांच्या नेतृत्वात पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती सजगाणे यांना या संदर्भात माहिती देऊन निवेदन सादर केले. त्यांनी सुद्धा या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पंचायत समितीचे आरोग्य अधिकारी नारखडे आणि पाटील यांना तात्काळ दुधगाव बु.या गावी गावकऱ्यांसोबत रवाना केले आणि त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे निर्देश दिले.

निवेदन देतेवेळी सेवा ट्रस्टचे पदाधिकारी मोहन शिरसाठ, प्रतापराव बिराळे तर गावकऱ्यांतर्फे संजय झनके ,गोविंदराव झनके, अमोल झनके, विश्वराज झणके ,मनोहर झनके, धम्मपाल झनके, नीना झणके,प्रशांत झणके, भीमराव झनके ,संतोष झनके आणि गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## मेहकरमध्ये हुंड्यासाठी छळाचा आरोप; विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी २६ जून

### ◆ वडिलांच्या तक्रारीवरून पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

**मेहकर:** हुंड्यासाठी वारंवार पैशांची शारीरिक मागणी करत मानसिक व छळ केल्याच्या आरोपातून २६ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मेहकर शहरातील बालाजी नगर परिसरात घडली. या प्रकरणी मृत विवाहितेचे वडील रतन श्रीकिसन पागोरे (रा. बारई, ता. मेहकर) यांच्या तक्रारीवरून पती, सासू, सासरे आणि नणंद यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे, हुंडा प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पतीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

मृत वैष्णवी गणेश मेरत (२६) हिचा विवाह २२ एप्रिल २०२२ रोजी झाला होता. फिर्यादीनुसार, विवाहानंतर चारचाकी वाहनासाठी आर्थिक मदत, वाहन कर्जाचे हप्ते, नातेवाईकांच्या लग्नाचा खर्च तसेच इतर कारणांसाठी माहेरहून वारंवार पैसे आणण्याचा दबाव टाकला जात होता. या कारणावरून तिचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात येत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, काही दिवसांपूर्वी वैष्णवीकडे १० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. पैसे न आणल्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा तसेच मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. २३ जून रोजी सकाळी वैष्णवीने वडिलांशी दूरध्वनीवर संपर्क साधून होत असलेल्या त्रासाची माहिती दिल्यानंतर काही वेळातच तिच्या आत्महत्येची माहिती कुटुंबीयांना मिळाली. या प्रकरणी पती गणेश रामेश्वर मेरत, सासरे रामेश्वर मेरत, सासू मीना मेरत व नणंद मोहिनी जाधव (मेरत) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत वैष्णवीचा तीन वर्षांचा मुलगा आयांश मातृछत्राला मुकल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान सासरी होणारा त्रास असह्य झाल्याने विवाहीतेने तिच्या वडिलांना प्रारंभी फोन केला होता. परंतु नंतर ही घटना घडल्याचे समोर आले.

## चिंचपूर येथे एकाचा खून; मोताळा तालुक्यात खळबळ

प्रतिनिधी २६ जून

**मोताळा:** खामगाव-मोताळा तालुक्यातील चिंचपूर येथे पहाटेच्या सुमारास घडलेल्या खूनाच्या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शेख नईम शेख सलीम (वय अंदाजे ४० वर्षे) असे मृत व्यक्तीचे नावनाव आहे.

या व्यक्तीच्या खुनामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वैयक्तिक वाद, जुन्या वैमनस्यातून किंवा अन्य कारणांमुळे ही घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू असून संशयितांचा शोध घेण्यात येत आहे. घटनेनंतर चिंचपूर आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शांतसमजल्या जाणाऱ्या परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला असून त्याचा अहवाल आल्यानंतर अधिक माहिती स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे वेगाने फिरविली असून लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## जून महिन्याचे धान्य वाटपाकरीता ३० जूनपर्यंत मुदत वाढ

प्रतिनिधी २६ जून

**मलकापूर:** शासनाने एप्रिल, मे जून या तीन महिन्यांचे लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्यात आले आहे. मात्र ई-पॉस मशिनच्या तांत्रित अडचणीमुळे काही लाभार्थ्यांपर्यंत धान्य न पोहचल्याने व शासनाने दिलेल्या मुदतीत धान्याचे वितरण करण्याचे निर्देश होते. मात्र यापासून कोणीही वंचित राहू नये ही बाब लक्षात आल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी आज २५ जून रोजी ३० जूनपर्यंत मुदत वाढ दिली आहे.

केंद्र सरकारने राज्य शासनाला राज्यातील स्वस्त धान्य दुकानांचे लाभार्थी असलेल्यांना एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी वितरीत करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानदारांनी पात्र असलेल्या सर्व लाभार्थ्यांना धान्याचे वितरण केले होते. मात्र ई-पॉस मशिनवर डाटा हा फक्त १५ जून पर्यंतच टाकण्यात आला होता. तेव्हापासून त्या ई-पॉस मशिन काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने काही प्रमाणात धान्याचे वितरण रखडले होते. मात्र आज २५ जून रोजी प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी रूपेश बिजेवार यांनी एका आदेशान्वये ज्या स्वस्त धान्य दुकानांचे माहे जून २०२६ चे वाटप कमी आहे, अशा स्वस्त धान्य दुकानदारांना नियमित वेळ व वाटप होण्याच्या दृष्टीने अतिरिक्त वेळ दुकाने उघडी ठेवून वाटप पुर्ण करून घेण्याच्या सूचना तसेच माहे जून २०२६ करीतहा मुदतवाढ ३० जून पर्यंतच आहे. याबाबत लाभार्थ्यांपर्यंत माहिती



पोहचविण्याकरीता दुकानदारांना गावांमध्ये दवंडी देण्याबाबतच्या सूचना, ज्या स्वस्त धान्य दुकानांचे वाटप कमी आहे अशा दुकानांना भेटी देवून वाटप पुर्ण करून घेणेबाबत निरीक्षण अधिकारी, पुरवठा निरीक्षक यांना सूचना देण्यात याव्यात, प्राधान्याने माहे जून २०२६ या महिन्याचे वाटप ३० जूनपर्यंत पुर्ण करण्याच्या सूचना स्वस्त धान्य दुकानदारांना देण्यात याव्यात. पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

त्याबाबत तक्रार होणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्या तालुक्यांचे माहे जून २०२६ चे धान्य अद्यापपावेतो दुकानात पोहच झाले नाही, त्यांना आजच धान्य पोहच करण्याबाबतच्या सूचना गोदाम व्यवस्थापक यांना देण्याचे निर्देश जिल्ह्यातील तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

ऑनलाईन ई-पॉस वितरण अहवालाचे अवलोकन केले असता स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थ्यांपर्यंत माहे जून महिन्याचे वाटप मोताळा ४३ टक्के, लोणार ८. १३ टक्के, मेहकर ५४.०५ टक्के, संग्रामपूर ४५.३४ टक्के, मलकापूर ८९.१३ टक्के या प्रमाणात झाले असल्याचे निदर्शनात येते. तसेच माहे जून महिन्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. यानंतर पुन्हा मुदत वाढ देण्यात येणार नाही. अशा सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिल्या आहेत.

## पहिल्याच पावसात शेतरस्ता वाहून गेला

प्रतिनिधी २६ जून

**पिंप्री गवळी :** ठेकेदाराच्या हलकर्जीपणामुळे पिंप्री गवळी येथील शेकडो शेतकऱ्यांचा शेत रस्ता पहिल्याच पावसात वाहून गेल्यामुळे ऐन शेती कामाच्या दिवसात शेतकऱ्यांना शेतात जाण्याची पंचाईत झाली आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत टाकळी ते पिंप्री गवळी या रस्त्याचे डांबरीकरण झाले असून याच मार्गावर पिंपरी गवळीजवळ नुकतेच महिन्यापूर्वी एका पुलाचे काम पूर्ण झाले आहे. या पुलाला लागूनच दक्षिणेकडे शेकडो शेतकऱ्यांचा शेता रस्ता आहे. या पुलामुळे पुराचे येणारे पाणी व रस्त्यावरून वेगाने येणाऱ्या पाण्यामुळे या शेत रस्त्याला नुकसान होण्याची शक्यता होती. हा धोका टाळावा म्हणून या मार्गावरील काही शेतकऱ्यांनी पुलाचे काम पूर्ण होण्याआधीच तेथे उपस्थित असलेल्या आमदार संजय गायकवाड, अधीक्षक अभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच उपस्थित असलेल्या ठेकेदारांना नदीलगत असलेल्या शेत रस्त्याच्या सुरुवातीला एक लहान संरक्षक भिंत बांधण्याचे सांगितले होते. आ. संजय गायकवाड यांनीही संबंधित अभियंता व

ठेकेदांना याविषयी सूचना दिल्या होत्या ठेकेदाराने होकार दिला होता. परंतु नंतर ठेकेदाराने कोणाचेच ऐकले नाही. त्यामुळे त्या ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे शेकडो शेतकऱ्यांना नाहक त्रास होत आहे. काल झालेल्या पावसामुळे संपूर्ण शेत रस्ता वाहून गेला व सगळीकडे चिखलच चिखल झाल्यामुळे शेतकऱ्यांना पाय ठेवायला सुद्धा जागा नाही. एकीकडे कोणत्याही शेतकऱ्याला कोणते प्रकारचा त्रास होऊ नये. यासाठी शासन प्रत्येक शेतकऱ्यांना येण्या जाण्यासाठी व मालवाहतूक करण्यासाठी पांदण रस्त्याला प्राधान्य देत आहेत. तर दुसरीकडे संबंधित अधिकारी व ठेकेदार आपली मनमानी करीत आहे. सर्व शेतकऱ्यांची पेरणीची घाई सुरू आहे. तेव्हा अशा शेती कामाच्या दिवसात शेतकऱ्यांसह शेतमजुरांनाही शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. तेव्हा संबंधित अधिकाऱ्याने व ठेकेदाराने या शेतकऱ्यांचा शेत रस्ता भविष्यात त्यांना त्रास होणार नाही. अशा पद्धतीने दुरुस्त करून द्यावा. अशी या शेतकऱ्यांची मागणी आहे.

## साखरखेर्डा ग्रामीण रूग्णालयात पदनिर्मितीचा मार्ग मोकळा

### ◆ २४ जूनच्या शासन निर्णयाद्वारे २६ पदांना मंजुरी

प्रतिनिधी २६ जून

**सिंदखेडराजा :** तालुक्यातील साखरखेर्डा येथे नव्याने उभारण्यात आलेले ग्रामीण रुग्णालय तातडीने कार्यान्वित व्हावे, यासाठी माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने २४ जून रोजी शासन निर्णय क्र. पदनि-२०२५/ प्र.क्र. १०९/पासु-२ निर्गमित करून या ग्रामीण रुग्णालयासाठी २६ नवीन पदांच्या निर्मितीस मंजुरी दिली आहे. असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर यांची स्वीय सहाय्यक शेखर काळे यांनी दिली आहे.

साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाची अत्याधुनिक इमारत पूर्ण झाली असली, तरी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालय प्रत्यक्षात सुरू होऊ शकले नव्हते. परिणामी परिसरातील हजारो नागरिक, माता-भगिनी, बालके, ज्येष्ठ नागरिक तसेच आपत्कालीन रुग्णांना उपचारासाठी दूरवर जावे लागत असल्याने मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता. ही गंभीर बाब लक्षात घेऊन माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर यांनी शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन रुग्णालय तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. त्यांनी शासनाकडे सविस्तर निवेदन सादर करून खालील आवश्यक पदे तातडीने मंजूर करण्याची मागणी केली होती. ?

वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी अधिपरिचारिका, क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ औषध निर्माण अधिकारी, सहाय्यक अधीक्षक, कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, प्रयोगशाळा सहाय्यक, कक्षसेवक, शिपाई, सफाईगार आणि वाहनचालक शासनाच्या या निर्णयामुळे साखरखेर्डा ग्रामीण रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे सिंदखेडराजा तालुक्यासह परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार, सुलभ व तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

## नितीन सावंत यांचे शनिवारी बुलढाण्यात व्याख्यान

**बुलढाणा :** महात्मा ज्योतिराव फुले व राजर्षी शाहू महाराज या दोन्ही युगपुरुषांनी समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. त्यांचे विचार घेऊन सदोदित वेगळा विचार देणाऱ्या मराठा सेवा संघाने यावर्षी फुले जन्मशताब्दी वर्ष व राजर्षी शाहू महाराज जयंतीच्या पर्वावर बुलढाण्यात शनिवार २७ जून पुरोगामी विचाराचे गाढे अभ्यासक शिवश्री नितीन सावंत यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजिनीयर रविकांत काळवाघे जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ आहे. तर दलितमित्र माधवराव हुडेकर, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. २७ जून रोजी सकाळी ११ वाजता शरद कला महाविद्यालय, हाजी मलंग दर्याच्या पाठीमागे, चिखली रोड बुलढाणा येथे शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचे विचार व आजचे वास्तव या विषयावर नितीन सावंत मार्गदर्शन करणार आहेत.

## आषाढी वारीसाठी २१ व २३ जुलैला खामगावहून पंढरपूरसाठी विशेष रेल्वे

प्रतिनिधी २६ जून


### ◆ जिल्ह्यातील वारकऱ्यांसह प्रवाशांना मोठा दिलासा

**खामगाव:** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने खामगाव पंढरपूर विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. जुलै महिन्यात या विशेष रेल्वेच्या एकूण चार फेऱ्या होणार असून, खामगाव, शेगाव, नांदुरा, संग्रामपूर, जळगाव जामोद, मलकापूरसह परिसरातील वारकऱ्यांना पंढरपूरला जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, गाडी क्रमांक ०११२१ ही विशेष रेल्वे २१ जुलै व २३ जुलै रोजी खामगाव येथून सकाळी ११:३० वाजता सुटेल. ही गाडी विविध स्थानकांवर थांबे घेत दुसऱ्या दिवशी पहाटे ३:३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०११२२ ही विशेष रेल्वे २२ जुलै व २४ जुलै रोजी पंढरपूर येथून सकाळी ५:०० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ७:३० वाजता खामगाव येथे दाखल होईल.

**उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील प्रवाशांनाही सेवेचा लाभ!**
या विशेष रेल्वेला जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्दुवाडी या महत्त्वाच्या स्थानकांत थांबे देण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ बुलढाणा जिल्ह्यातीलच नव्हे, तर उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील प्रवाशांनाही या सेवेचा लाभ मिळणार आहे.

**अशी आहे रेल्वेची रचना**
रेल्वेची रचना प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन करण्यात आली आहे. या विशेष रेल्वेत २ वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे, १० शयनयान डबे, ४ सामान्य द्वितीय श्रेणी डबे तसेच २ सामान-सह-गार्ड ब्रेकव्हॅन असतील. त्यामुळे विविध आर्थिक स्तरातील प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



**प्रवाशांसाठी सुलभ**
खामगाव रेल्वे स्थानकातून पंढरपूरसाठी थेट विशेष रेल्वे उपलब्ध होत असल्याने वारकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. दरवर्षी आषाढी वारीच्या काळात हजारो भाविक पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या काळात बस आणि खासगी वाहनांवर मोठा ताण येतो. अशा परिस्थितीत विशेष रेल्वे सेवा सुरू केल्याने वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि आरामदायी होणार आहे.



























हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135